

गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



* वर्ष ६५ वे * अंक २९७ * नांदेड * शनिवार, दि. ७ नोव्हेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

अजितदादा असते तर दोन्ही राष्ट्रवादी आज एकत्र दिसल्या असत्या; सुनील तटकरेंचं वक्तव्य

खा. प्रफुल पटेल यांनी शरद पवारांची भेट घेतल्यानंतर तटकरेंनी केलेल्या वक्तव्यामुळे राजकीय चर्चांना उधाण



मुंबई (प्रतिनिधी)– राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्य सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाबद्दल मोठं भाष्य केलं आहे. अजितदादा असते तर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस आज एकत्र दिसले असते, असे सुनील तटकरे म्हणाले. इतकंच नाही तर अजित पवार यांच्या निधनामुळे ही चर्चा मागे पडली, मात्र अजित पवार असते तर जी १२ फेब्रुवारीही तारीख जी सांगितली जाते ती निश्चित झाली असती आणि दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र दिसल्या असत्या, असंही सुनील तटकरे म्हणाले.

नुकतेच राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल यांनी शरद पवार यांची रुग्णालयात जाऊन भेट घेतली होती. या भेटीनंतर प्रफुल पटेल यांनी आम्ही राजकीयदृष्ट्या दुरावलो आहोत पण मनाने नाहीत असे वक्तव्य केले होते. आता यानंतर सुनील तटकरे यांनी विलिनीकरणावर भाष्य केल्याने, राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाची सध्या तरी कुठलीच चर्चा नाही. पण अजितदादा असते तर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस आज एकत्र दिसल्या असत्या. अजित पवार यांच्या निधनामुळे ही चर्चा मागे पडली. अजित पवार असते तर जी १२ फेब्रुवारी ही तारीख जी सांगितली जाते ती निश्चित झाली असती. मी त्यांच्या जवळचा सहकारी असल्याने दादांनी मला याबाबत सांगितलं होतं. दादा असते तर हे विलिनीकरण पाहता आले असते.

दरम्यान, याबाबत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी वक्तव्य केले आहे. ते शिंदे म्हणाले, सुनील तटकरेंनी सत्य परिस्थिती सांगितली. अजित पवार असताना विलिनीकरणाची चर्चा झाली होती. आज तटकरे म्हणत असले तरी आम्ही याबाबत यापूर्वीच आम्ही बोलत होतो, पण ती मानलं जात नव्हतं. ते तटकरे साहेब बोलल्यामुळे त्यावर शिक्कामोर्तब झालं. आज दोन्ही पक्ष एकत्र असते तर महाराष्ट्रातील जिल्हा परिषद, महानगरपालिका वगैरेचं चित्र वेगळं दिसलं असते. दादांनाही तेच अपेक्षित होतं, पक्ष मजबुतीने ताकदीने उभा राहण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र यायला हव्यात हे शरद पवार आणि अजित पवारांना अपेक्षित होते. त्यादृष्टीनेच विलिनीकरणाची चर्चा झाली होती.

सीबीएसई १०वी आणि १२ वीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

नवी दिल्ली (प्रतिनिधी)– केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) इयत्ता १०वी आणि १२वीच्या आगामी वार्षिक परीक्षांसाठीचे अधिकृत वेळापत्रक जाहीर केले आहे. मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, १०वी आणि १२वी अशा दोन्ही वर्गांच्या मुख्य प्रात्यक्षिक व लेखी परीक्षा १६ फेब्रुवारी २०२७ पासून एकाच वेळी सुरू होणार आहेत. परीक्षांचे नियोजन अचूक व्हावे आणि विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पुरेसा वेळ मिळावा, या उद्देशाने मंडळाने परीक्षा सुरू होण्याच्या तब्बल १०१ दिवस आधीच हे वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे.

सीबीएसईने दिलेल्या माहितीनुसार, प्रात्यक्षिक परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापन ०१ जानेवारी २०२७ पासून शाळांच्या स्तरावर सुरू होणार आहे.

परीक्षेच्या पहिल्याच दिवशी म्हणजेच १६ फेब्रुवारी २०२७ रोजी इयत्ता १२वीचा भौतिकशास्त्र विषयाचा महत्त्वाचा पेपर होणार आहे. तर १०वीचा पेंटिंग आणि इतर प्रादेशिक भाषांचा पेपर पार पडेल.

त्यानंतर गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र, इंग्रजी, हिंदी, रसायनशास्त्र तसेच वाणिज्य व कला शाखेचे सर्व प्रमुख पेपर्स टप्प्याटप्प्याने पार पडतील. दोन पेपर्सच्या दरम्यान विद्यार्थ्यांना उजळणीसाठी पुरेसा वेळ देण्यात आला आहे.

आली दिवाळी..!



नांदेड : दिवाळी सणाला सुरूवात झाली असून शहरातील बाजारपेठा फुलल्या आहेत. बाजारपेठेत विविध प्रकारचे आकाश कंदिल, फटाके व फराळांचे साहित्य घेण्यासाठी नागरिकांची लगबग सुरू झाल्याचे पहावयास मिळत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

नांदेडमध्ये आरोग्यमंत्र्यांनी ११ जणांना दाखविला घरचा रस्ता!


नांदेड (प्रतिनिधी)– आरोग्य विभागातील अकार्यक्षम आणि बेजबाबदार अधिकारी, कर्मचारी आणि डॉक्टर हे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकरांच्या रडारवर आल्याचे चित्र आहे. कारण सध्या सुरु असलेल्या आरोग्य संवाद यात्रेच्या पहिल्याच दिवशी नांदेडमध्ये प्रकाश आबिटकरांनी अकार्यक्षम अशा ११ जणांना घरचा रस्ता दाखवला आहे. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर हे सध्या राज्यातील विविध जिल्ह्यांना आरोग्य संवाद यात्रेच्या माध्यमातून भेट देत आहेत. या भेटीत जिल्हा व तालुका पातळीवरील आरोग्य विभागाची दवाखाने रुग्णालयं यांना भेटी देत आढावा घेत आहेत.

दरम्यान, या संवाद यात्रेच्या पहिल्याच दिवशी नांदेडमध्ये मंत्री प्रकाश आबिटकर यांना लोहा, मुखेड, हिमायत नगर, सोनखेड या तालुक्यात अनेक दवाखान्यात आरोग्य यंत्रणा कमकुवत जाणवली. दवाखाने किंवा रुग्णालयात बेजबाबदार आणि अकार्यक्षम, आरोग्यसेवा देण्यात अपयशी दिसलेल्या ११ जणांवर तात्काळ कारवाईचा आदेश दिले. यात ६ डॉक्टर, २ आयडीडब्ल्यू इंजिनिअर, २ डीपीएम राष्ट्रीय आरोग्य विभाग अभियान अधिकारी, २ तालुका आरोग्य अधिकारी यांचा समावेश आहे. तर १० जणांच्या चौकशीचे आदेश देत दोषी आढळल्यास तात्काळ निलंबनाच्या कारवाईच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच ४ जणांच्या तात्काळ बदलीचे आदेशही दिल्याने आरोग्य विभागातील कामचुकार अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले असून कारवाई अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

जगभरातील शेअर बाजारात पडझड, पण भारतीय शेअर बाजारात मात्र उत्साहाचं वातावरण

मुंबई (प्रतिनिधी)– भारतीय शेअर बाजारातील तेजी सलग सातव्या दिवशी भारतीय शेअर बाजारात कायम राहिली. मात्र, अमेरिका, जपान आणि चीनच्या बाजारात घसरण झाली. यामुळं गुंतवणूकदारांचे ३ ट्रिलियन डॉलरचं नुकसान झालं. जपानच्या बाजारात देखील ६ टक्क्यांची घसरण झाली.

भारतीय शेअर बाजारात मोठी तेजी दिसून आली. सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये तेजी पाहायला मिळाली. सेन्सेक्सनं आज ८१ हजारांचा टप्पा पार केला. सेन्सेक्स १७१८ अंकांनी वाढून ८१,०२६ वर बंद झाला. तर निफ्टी ४९३ अंकांच्या तेजीसह २५,०३० रुपयांवर पोहोचला.बँक निफ्टीमध्ये १३०० अंकांची तेजी पाहायला मिळाली तो निर्देशांक ५९०८६ अंकांवर बंद झाला.



खा. अशोकराव चव्हाण यांनी घेतली राष्ट्र चिंतन संवाद बैठक; विरोधकांवर केली टीका



नांदेड (प्रतिनिधी)– माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी नांदेडच्या विविध क्षेत्रांतील प्रबुद्ध नागरिकांच्या उपस्थितीत 'राष्ट्र चिंतन संवाद' या विशेष संवादात्मक कार्यक्रमाचे आयोजन केले. या संवादाच्या माध्यमातून मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेबाबत वस्तुस्थितीची माहिती देत त्यांनी 'लोकशाही वाचवा, अराजकता हटवा'चा नारा दिला.

शहरातील अनेक नामवंत डॉक्टर, वकील, चार्टर्ड अकाउंटंट, व्यापारी, साहित्यिक तसेच शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाला या विचारप्रवर्तक कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते बाळासाहेब पांडे, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, आमदार श्रीजया चव्हाण, प्रदेश भाजप उपाध्यक्ष संजय कौडगे, चैतन्यबापू देशमुख, नांदेड उत्तरचे भाजपा जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, उपमहापौर दीपकसिंह रावत आणि भाऊराव चव्हाण सहकारी (पान ३ वर...)

गाडी दुरुस्तीला टाळाटाळ; टाटा मोटर्सने १० लाख रूपये परत करण्याचे आयोगाचे आदेश

नांदेड (प्रतिनिधी)– वाहनाचे उत्पादन बंद झाल्याचे कारण देत दुरुस्तीसाठी आवश्यक सुटे भाग उपलब्ध करून न देणे टाटा मोटर्सला भोवले आहे. वाहनाची नोंदणी वैध असतानाही सुटे भाग न दिल्याने सेवेतील त्रुटी आणि अनुचित व्यापारी प्रथेचा अवलंब केल्याचा ठपका ठेवत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने टाटा मोटर्स, मुंबई यांना दणका दिला आहे. वाहनाचे सुटे भाग ३० दिवसांत उपलब्ध करून द्यावेत आणि त्यानंतर १५ दिवसांत वाहन दुरुस्त करावे, असे आदेश आयोगाने दिले. अन्यथा वाहनाची १० लाख रुपये किंमत तक्रार दाखल केल्याच्या तारखेपासून ९ टक्के व्याजासह परत करावी, असा निकाल २३ ऑक्टोबर रोजी देण्यात आला.

नांदेड शहरातील भीमघाट, मिल एरिया परिसर येथील वैभव शंकरराव गायकवाड यांची ही तक्रार आहे. ते धाराशिव जिल्ह्यातील परंडा येथे सरकारी वकील म्हणून कार्यरत आहेत. त्यांची टाटा सफारी स्टॉर्म (एमएच २६ एव्ही ८८९९) ही गाडी तांत्रिक बिघाडामुळे १५ जानेवारी २०२६ रोजी पद्मजा मोटर्स येथे दुरुस्तीसाठी दिली होती. ८ दिवसांत गाडी देण्याचे आश्वासन देऊनही अनेक महिने दुरुस्ती झाली नाही.

गाडीच्या दुरुस्तीसाठी आवश्यक बेअरिंग फ्रेम आणि इलेक्ट्रॉनिक नियंत्रण यंत्रणा उपलब्ध नसल्याचे कंपनीकडून सांगण्यात आले. वाहनाचे मॉडेल बंद झाल्याने सुटे भाग मिळत नसल्याचा बचावही घेण्यात आला. मात्र वाहनाची नोंदणी ४ जुलै २०३० पर्यंत वैध असताना सुटे भाग उपलब्ध करून देणे ही कंपनीची जबाबदारी असल्याचे आयोगाने स्पष्ट केले. अध्यक्ष राहुल पाटील आणि सदस्य ज्ञानेश्वर पवार यांच्या आयोगाने हा निकाल दिला. तक्रारदारातर्फे ॲड. ओंकार कुर्तडीकर यांनी काम पाहिले. निकालाची पूर्तता ४५ दिवसांत करावी लागणार आहे.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. द्वैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

छोट्या शहरांकडे वळणारी रोजगाराची दिशा

भारतीय माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील रोजगारा-चे पारंपरिक चित्र आता हळूहळू बदलताना दिसत आहे. बंगळुरू, हैदराबाद, चेन्नई, पुणे यांसारख्या महानगरांभोवती केंद्रित झालेल्या आयटी रोजगाराच्या संधी आता द्वितीय आणि तृतीय श्रेणीतील शहरांकडे सरकू लागल्या आहेत. हा बदल केवळ रोजगाराच्या आकडेवारीतील चढ-उतार नाही, तर भारताच्या आर्थिक विकासाच्या बदलत्या भूगोलाचे महत्त्वपूर्ण संकेत देणारा आहे. एका अहवालानुसार सप्टेंबरमध्ये भारतात नव्या नोकऱ्यांची मागणी १.१७ लाखांहून अधिक होती. मागील महिन्याच्या तुलनेत त्यात १५ टक्क्यांची वाढ झाली. सुमारे ५७ हजार सक्रिय नोकरीच्या संधी उपलब्ध होत्या. विशेष म्हणजे पूर्णवेळ नोकऱ्यांपेक्षा इंटर्नशिप आणि अर्धवेळ कामाच्या संधींमध्ये तब्बल ९० टक्क्यांची वाढ झाली आहे. याचा अर्थ रोजगार बाजारपेठ नव्या स्वरूपात विस्तारत आहे. मात्र या आकडेवारीतील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे रोजगारवाढीचे केंद्र महानगरांऐवजी लहान शहरांकडे सरकणे. बंगळुरू आणि हैदराबादमध्ये सक्रिय नोकऱ्यां-मध्ये अनुक्रमे १५ आणि ८ टक्क्यांची घट झाली, तर चेन्नईमध्ये आयटी रोजगार जवळपास ३० टक्क्यांनी कमी झाला. याउलट द्वितीय आणि तृतीय श्रेणीतील शहरांमध्ये आयटी क्षेत्रातील सक्रिय नोकऱ्यांमध्ये तब्बल ९५ टक्क्यांची वाढ झाली आहे. ही आकडेवारी महानगरांच्या रोजगारकेंद्री विकास मॉडेलला गंभीर प्रश्न विचारणारी आहे. यामागे अनेक कारणे आहेत. महानगरांमधील प्रचंड कार्यालयीन खर्च, महागडी घरे, वाहतूक कोंडी, वाढती जीवनशैलीची किंमत आणि पायाभूत सुविधांवरील ताण यामुळे कंपन्यांना पर्यायी ठिकाणांचा शोध घ्यावा लागत आहे. त्याच वेळी लहान शहरांमध्ये कार्यालये उभारण्याचा खर्च तुलनेने कमी आहे. स्थानिक पातळीवर उपलब्ध होणारे सुशिक्षित मनुष्यबळही आता कंपन्यांसाठी आकर्षक ठरत आहे. महत्त्वाचे म्हणजे हा बदल केवळ आयटी कंपन्यांमुळे होत नाही. सेमीकंडक्टर, संरक्षण तंत्रज्ञान, अवकाश तंत्रज्ञान, डेटा सेंटर, ऑटो-मोबाईल, पोलाद, ॲल्युमिनियम, एफएमसीजी आणि अन्य उत्पादन क्षेत्रातील गुंतवणूकही लहान आणि मध्यम शहरांकडे वळत आहे. भारताच्या स्टार्टअप संस्कृतीने या प्रक्रियेला आणखी वेग दिला आहे. मात्र या बदलाकडे केवळ उत्साहाच्या नजरेने पाहणे पुरेसे नाही. लहान शहरांमध्ये रोजगार निर्माण करण्यासाठी दर्जेदार शिक्षण, तांत्रिक प्रशिक्षण, वेगवान इंटरनेट, विश्वासार्ह वीजपुरवठा, आधुनिक वाहतूक, आरोग्य सुविधा आणि दर्जेदार नागरी पायाभूत सुविधा आवश्यक आहेत. अन्यथा उद्योग शहरात येतील; पण अपेक्षित दर्जाचे मनुष्यबळ उपलब्ध न झाल्याने रोजगाराच्या संधी पुन्हा महानगरांकडे वळण्याचा धोका राहील. याशिवाय 'वर्क फ्रॉम होम'च्या तुलनेत 'वर्क फ्रॉम ऑफिस'ला कंपन्यांचे वाढते प्राधान्यही लक्षात घेण्यासारखे आहे. कार्यालयीन नोकऱ्यांमध्ये २६ टक्क्यांची वाढ झाली असताना पूर्णवेळ रिमोट आणि हायब्रिड नोकऱ्यांमध्ये अनुक्रमे २१ आणि ७ टक्क्यांची घट झाली आहे. त्यामुळे लहान शहरांमध्ये रोजगार निर्माण होत असतील तर तेथे आधुनिक कार्यालयीन परिसंस्था उभारणे ही काळाची गरज आहे. नांदेडसारख्या शहरांसाठी हा बदल विशेष महत्त्वाचा आहे. मराठवाड्यातील तरुण मोठ्या शहरांकडे रोजगारासाठी स्थलांतरित होण्याऐवजी त्यांच्या स्वतःच्या शहरातच आधुनिक रोजगाराच्या संधी मिळवू शकतील, अशी परिस्थिती निर्माण करणे शक्य आहे. त्यासाठी सरकार, विद्यापीठे, स्थानिक उद्योग आणि स्टार्टअप्स यांनी समन्वयाने पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. भारताचा पुढील आर्थिक विकास केवळ महानगरांच्या विस्तारावर अवलंबून राहू नये. 'लहान शहरांमध्ये मोठ्या संधी' निर्माण करणे हेच पुढील दशकाचे विकासमंत्र ठरू शकते. रोजगाराचे विकेंद्रीकरण झाले, तर त्याचा फायदा केवळ तरुणांना होणार नाही; महानगरांवरील लोकसंख्येचा ताणही कमी होईल आणि देशाच्या आर्थिक विकासाला अधिक व्यापक सामाजिक आधार मिळेल. लहान शहरांकडे वळणारा रोजगाराचा हा प्रवाह कायम ठेवण्यासाठी आता धोरणात्मक गुंतवणुकीची गरज आहे. कारण भविष्यातील भारताची आर्थिक ताकद केवळ मुंबई, बंगळुरू किंवा हैदराबादमध्ये नव्हे, तर नांदेड, लातूर, औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूरसारख्या असंख्य शहरांच्या नव्या आकांक्षांमध्ये दडलेली आहे.

दिवाळी म्हणजे अंधाराकडून प्रकाशाकडे जाण्याची शिकवण!



दिवाळी हा केवळ दिव्यांचा, रोषणाईचा आणि आनंदाचा सण नाही, तर मानवी जीवनाला सकारात्मकतेची दिशा देणारा भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वपूर्ण उत्सव आहे. अंधारावर प्रकाशाचा, असत्यावर सत्याचा आणि वाईट प्रवृत्तींवर चांगल्या विचारांचा विजय म्हणजे दिवाळी. तमसो मा ज्योतिर्गमय अर्थात अंधाराकडून प्रकाशाकडे घेऊन जा, हा उपनिषदांतील संदेश दिवाळीच्या सणातून अधिक प्रभावीपणे व्यक्त होतो. मात्र, आजच्या बदलत्या जीवनशैलीत दिवाळीचा खरा अर्थ आपण कितपत समजून घेत आहोत, हा विचार करण्याची वेळ आली आह दिवाळी आली की घराघरांत स्वच्छता, रंगरंगोटी, आकाशकंदील, पणत्या, रांगोळ्या आणि फराळाची लगबग सुरू होते. बाजारपेठा विद्युत रोषणाईने उजळून निघतात. लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण असते. परंतु या बाह्य रोषणाईसोबतच आपल्या मनातील अज्ञान, द्वेष, मत्सर, अहंकार, स्वार्थ आणि नकारात्मक विचारांचा अंधार दूर करणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण खऱ्या अर्थाने दिवाळी तेव्हाच साजरी होईल, जेव्हा प्रत्येकाच्या मनात माणुसकीचा दिवा प्रज्वलित होईल.

आज समाज अनेक समस्यांनी ग्रासलेला आहे. भ्रष्टाचार, व्यसनाधीनता, बेरोजगारी, महागाई, सामाजिक विषमता, अंधश्रद्धा आणि वाढता स्वार्थ यांसारख्या समस्या समाजाच्या प्रगतीसमोर आव्हान निर्माण करीत आहेत. अशा परिस्थितीत केवळ घराबाहेर दिवे लावून चालणार नाही, तर समाजातील अज्ञान आणि अनिष्ट प्रथांचा अंधार दूर करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. शिक्षणाचा प्रसार, स्त्री-पुरुष समानता, पर्यावरण संवर्धन, सामाजिक सलोखा आणि गरजूंना मदतीचा हात देणे हीच खऱ्या अर्थाने प्रकाशाची वाट आहे. दिवाळीचा सण आपल्याला दुसऱ्यांच्या आयुष्यात आनंद निर्माण करण्याची संधी देतो. आपल्या घरात गोडधोड पदार्थांची रेलचेल असताना समाजातील गरीब, वंचित, निराधार आणि गरजू कुटुंबांचाही विचार व्हायला हवा. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्यासाठी केलेली छोटीशी मदतसुद्धा दिवाळीचा आनंद द्विगुणीत करू शकते. श्रीमंतीचे प्रदर्शन करण्यापेक्षा माणुसकीचे दर्शन घडविणे अधिक महत्त्वाचे आहे. दुसऱ्यांच्या आयुष्यात आनंदाचा प्रकाश निर्माण करणे, हीच दिवाळीची खरी शिकवण आहे.

दिवाळी साजरी करताना पर्यावरणाची काळजी घेणेही तितकेच आवश्यक आहे. फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण आणि कचऱ्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. फटाक्यांच्या आवाजामुळे लहान मुले, वृद्ध व्यक्ती, रुग्ण तसेच पशुपक्ष्यांना त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे पर्यावरणपुरक दिवाळी साजरी करण्याचा संकल्प प्रत्येकाने करायला हवा. मातीच्या पणत्या लावणे, स्थानिक कारागिरांकडून वस्तू खरेदी करणे, अनावश्यक खर्च टाळणे आणि निसर्गाचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे. आजच्या डिजिटल युगात माणसाच्या हातात तंत्रज्ञानाचा प्रकाश आला असला, तरी अनेकदा विचारांमध्ये अंधार दिसून येतो. सोशल मीडियावरील गैरसमज, अफवा, द्वेषपूर्ण संदेश आणि दिखाऊपणाच्या स्पर्धेमुळे नात्यांमधील आपुलकी कमी होत आहे. अशा वेळी दिवाळीचा सण आपल्याला नात्यांमधील प्रेम, विश्वास, संवाद आणि जिव्हाळा जपण्याचा संदेश देतो. मनामनांतील अंतर कमी करून माणसांना जोडण्याचे काम दिवाळीने केले पाहिजे.

दिवाळी हा नव्या सुरुवातीचा सण आहे. जुन्या कटू आठवणी विसरून नव्या आशा, नवे संकल्प आणि सकारात्मक विचारांसह पुढे जाण्याची प्रेरणा हा सण देतो. प्रत्येकाने आपल्या जीवनात ज्ञानाचा दिवा, सदाचाराची वात आणि माणुसकीचे तेल प्रज्वलित केले, तर समाजातील अंधार निश्चितच दूर होऊ शकतो. शेवटी, दिवाळीचा खरा आनंद महागड्या रोषणाईत किंवा फटाक्यांच्या आतीषबाजीत नसून तो प्रेम, आपुलकी, समाधान आणि माणुसकीच्या प्रकाशात आहे. आपल्या घरातील एक दिवा दुसऱ्याच्या आयुष्यातही प्रकाश निर्माण करणारा ठरला पाहिजे. अज्ञानाकडून ज्ञानाकडे, निराशेकडून आशेकडे, द्वेषाकडून प्रेम ाकडे आणि स्वार्थाकडून परोपकाराकडे जाण्याचा संकल्प आपण करूया. दिवाळीच्या निमित्ताने केवळ घर नव्हे, तर मनही उजळवूया. कारण अंधार दूर करण्यासाठी एका दिव्याची ज्योत पुरेशी असते; फक्त ती ज्योत प्रज्वलित करण्याची तयारी आपल्यात असली पाहिजे! चला तर, यंदाची दिवाळी केवळ दिव्यांनी नव्हे, तर विचारांनी, संस्कारांनी आणि माणुसकीने उजळवूया!

-प्रा. संजय बडे
दहेगाव ता. वैजापूर,
जि. छत्रपती संभाजी नगर
मो.७८८८२९७८५९

कर्करोगाशी लढताना जागरूकताच खरी शक्ती!

कर्करोग हा शब्द उच्चारला तरी अनेकांच्या मनात भीती, अस्वस्थता आणि भविष्याविषयी अनिश्चितता निर्माण होते. मात्र कर्करोग म्हणजे आयुष्याचा शेवट नव्हे, तर योग्य वेळी निदान, आधुनिक उपचारपद्धती, सकारात्मक दृष्टिकोन आणि कुटुंबीयांची साथ यांच्या बळावर या आजारावर मात करता येऊ शकते. त्यामुळे कर्करोगाविषयी भीती बाळगण्यापेक्षा त्याबद्दल जागरूक राहणे ही काळाची खरी गरज आहे.

दरवर्षी ७ नोव्हेंबर हा दिवस राष्ट्रीय कर्करोग जनजागृती दिन म्हणून पाळला जातो. कर्करोगाचे वाढते प्रमाण, त्याची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, तपासणी आणि उपचार यांविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे हा या दिवसामागील प्रमुख उद्देश आहे. प्रसिद्ध भारतीय शास्त्रज्ञ डॉ. मेरी क्युरी यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस निवडण्यात आला आहे.त्यांच्या संशोधनाने कर्करोगावरील उपचारांच्या क्षेत्राला महत्त्वपूर्ण दिशा दिली.

आजच्या धावपळीच्या जीवनात बदललेली जीवनशैली, तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन, मद्यपान, असंतुलित आहार, शारीरिक हालचालींचा अभाव, लठ्ठपणा आणि काही पर्यावरणीय घटक यांमुळे कर्करोगाचा धोका वाढू शकतो. मात्र प्रत्येक कर्करोगाचे कारण एकच नसते. आनुवंशिकता आणि काही संसर्गजन्य घटकही विशिष्ट प्रकारच्या कर्करोगासाठी कारणीभूत ठरू शकतात. त्यामुळे आरोग्याबाबत निष्काळजीपणा न करता सजग राहणे आवश्यक आहे. तोंडातील न बऱ्या होणाऱ्या जखमा, शरीरात आढळणाऱ्या गाठी, अचानक वजन कमी होणे, दीर्घकाळ खोकला, असामान्य रक्तस्राव, आवाजात बदल किंवा शौच-विसर्जनाच्या सवयींमध्ये दीर्घकाळ बदल अशी काही लक्षणे दिसल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये. अर्थात, ही लक्षणे दिसली म्हणजे कर्करोगच आहे असे नाही; परंतु योग्य वैद्यकीय तपासणी करणे महत्त्वाचे आहे. विशेषतः स्तन, गर्भाशयमुख आणि तोंडाच्या कर्करोगाचे वेळेवर निदान झाल्यास उपचार अधिक प्रभावी ठरू शकतात.

कर्करोग प्रतिबंधासाठी तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांपासून पूर्णतः दूर राहणे, मद्यपान टाळणे, संतुलित आहार घेणे, नियमित व्यायाम करणे, वजन नियंत्रणात ठेवणे आणि आवश्यक लसीकरण करून घेणे महत्त्वाचे आहे. महिलांनी स्तन व गर्भाशयमुखाच्या कर्करोगासंदर्भात वैद्यकीय सल्ल्यानुसार तपासणी करून घ्यावी. पुरुषांनीही तोंडाच्या आरोग्याकडे विशेष



लक्ष द्यावे. कोणतीही तपासणी किंवा उपचार केवळ अफवा, जाहिराती अथवा अप्रमाणित घरगुती उपायांच्या आधारे करू नयेत.

कर्करोगाविषयी समाजात असलेला आणखी एक मोठा गैरसमज म्हणजे हा आजार झालेल्या व्यक्तीला समाजापासून वेगळे ठेवणे. प्रत्यक्षात कर्करोग हा संसर्गजन्य आजार नाही. रुग्णाला सहानुभूतीपेक्षा सन्मान, मानसिक आधार, प्रेम आणि उपचारांच्या प्रवासात खंबीर साथ देण्याची गरज असते. अनेकदा औषधोपचारांइतकीच कुटुंबीयांची मानसिक साथ रुग्णाला जगण्याचे बळ देते.


ग्रामीण भागात आजही आरोग्यविषयक माहितीचा अभाव, आर्थिक अडचणी, तपासणीची भीती आणि गैरसमज यांमुळे अनेक रुग्ण वेळेवर उपचार घेत नाहीत.प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, आशा सेविका, अंगणवाडी कर्मचारी, शिक्षक, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकत्रितपणे जनजागृती करणे गरजेचे आहे. शाळा आणि महाविद्यालयांमधूनही व्यसनमुक्ती, आरोग्यशिक्षण आणि निरोगी जीवनशैलीचे संस्कार रुजवले पाहिजेत. आरोग्य ही केवळ वैयक्तिक बाब नसून ती सामाजिक जबाबदारी आहे.

कर्करोगग्रस्त व्यक्तीला मदतीचा हात देणे, उपचारांविषयी योग्य माहिती पोहोचवणे आणि वेळेवर तपासणीचे महत्त्व पटवून देणे ही प्रत्येक नागरिकाची सामाजिक बांधिलकी आहे. शासनानेही सर्वसामान्यांना परवडणारे उपचार, तपासणीच्या सुविधा आणि ग्रामीण भागात तज्ज्ञ आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यावर भर दिला पाहिजे.

राष्ट्रीय कर्करोग जनजागृती दिन हा केवळ दिनविशेष साजरा करण्याचा दिवस नाही, तर आरोग्याबाबत आत्मपरीक्षण करण्याची संधी आहे. कर्करोगाविरुद्धची लढाई केवळ रुग्णाची नसते; ती संपूर्ण कुटुंबाची आणि समाजाची असते. भीतीऐवजी जागरूकता, अंधश्रद्धेऐवजी विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन आणि उपेक्षेऐवजी माणुसकीची साथ मिळाली, तर ही लढाई अधिक सक्षमपणे लढता येईल. कर्करोगाची भीती नको, अज्ञान नको; वेळेवर तपासणी, योग्य उपचार आणि जागरूक जीवनशैली हाच निरोगी भविष्याचा खरा मार्ग आहे.

– पंडित पवळे
नांदेड

रोनाल्डोचा निरोप; एका फुटबॉल युगाचा अस्त!



मैदानावरची जिद्द, विक्रमांची उंची आणि देशासाठी खेळण्याचा अभिमान यांचा अनोखा संगम असलेला ख्रिस्तियानो रोनाल्डो आता आंतरराष्ट्रीय फुटबॉलला अलविदा करत आहे. त्याच्या निवृत्तीने केवळ पोर्तुगालच्या फुटबॉलमधील एका पर्वाचा अंत झाला नाही, तर जगभरातील फुटबॉल चाहत्यांच्या एका भावनिक प्रवासालाही पूर्णविराम मिळाला आहे.

क्रीडा विश्वात काही खेळाडू केवळ आपल्या कामगिरीने ओळखले जात नाहीत, तर ते एका संपूर्ण पिढीच्या स्मृतींचा भाग बनतात. ख्रिस्तियानो रोनाल्डो हे त्यापैकीच एक नाव! तब्बल २३ वर्षे पोर्तुगालच्या राष्ट्रीय संघाचे प्रतिनिधित्व केल्यानंतर त्याने आंतरराष्ट्रीय फ ुटबॉलमधून निवृत्ती जाहीर केली. त्याच्या या निर्णयाने फुटबॉलविश्वात एक भावनिक पोकळी निर्माण झाली आहे. मैदानावर वेग, कौशल्य, ताकद, जिद्द आणि गोल करण्याची अद्भुत क्षम ता यांचा मिलाफ असलेला हा खेळाडू आता राष्ट्रीय संघाची सात क्रमांकाची जर्सी नव्या पिढीकडे सोपवणार आहे. रोनाल्डोची कारकीर्द म्हणजे केवळ विक्रमांची यादी नाही, तर प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वतःला सिद्ध करण्याची प्रेरणादायी कहाणी आहे. एका साम ान्य कुटुंबातून आलेल्या या खेळाडूने आपल्या मेहनतीच्या जोरावर जागतिक फुटबॉलमध्ये सर्वोच्च स्थान मिळवले. त्याने पोर्तुगालकडून २३४ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आणि १४६ गोल करण्याचा विक्रम नोंदवला. हे आकडे त्याच्या असामान्य क्षमतेची साक्ष देतात. मात्र, त्याच्या यशाचे खरे मोल केवळ आकड्यांमध्ये मोजता येणार नाही. त्याने आपल्या देशातील फ ुटबॉलप्रेमींना दिलेला अभिमान आणि आनंद अधिक महत्त्वाचा आहे.

२०१६ मधील युरो अजिंक्यपद हा रोनाल्डोच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील सर्वांत संस्मरणीय क्षण ठरला. पोर्तुगालला पहिल्यांदाच युरोपियन अजिंक्यपद मिळवून देण्यात त्याचे नेतृत्व महत्त्वाचे ठरले. त्यानंतर २०१९ आणि २०२५ मधील नेशन्स लीगचे विजे-तेपदही पोर्तुगालच्या यशस्वी वाटचालीतील महत्त्वाचे टप्पे ठरले. विशेष म्हणजे, वैयक्तिक विक्रमांच्या शिखरावर पोहोचूनही देशासाठी काहीतरी जिंकण्याची त्याची भूक कायम होती. राष्ट्रीय संघासाठी खेळताना त्याने प्रत्येक वेळी विजयासाठी झटण्याची वृत्ती दाखवली. मात्र, प्रत्येक महान खेळाडूच्या कारकिर्दीत काही अपूर्ण स्वप्नेही असतात. रोनाल्डोसाठी विश्वचषक विजेतेपद हे असेच एक अपूर्ण स्वप्न राहिले. सहा विश्वचषक स्पर्धांमध्ये पोर्तुगालचे प्रतिनिधित्व करूनही त्याला विश्वविजेतेपदाचा आनंद अनुभवता आला नाही. २००६ मध्ये पोर्तुगालने उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली होती. त्यानंतरही संघाकडून मोठ्या अपेक्षा होत्या; परंतु विश्वविजयाचे स्वप्न प्रत्यक्षात उतरले नाही. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, महान खेळाडू असला तरी प्रत्येक यश त्याच्या वाट्याला येतेच असे नाही. काही पराभव आणि अपूर्ण स्वप्नेही त्याच्या प्रवासाचा भाग बनतात.

रोनाल्डोच्या निवृत्तीच्या पार्श्वभूमीवर प्रशिक्षकाशी झालेल्या मतभेदांची चर्चाही होत आहे. खेळाडू आणि प्रशिक्षक यांच्यात मतभेद होणे हे क्रीडा क्षेत्रात नवीन नाही. मात्र, संघातील शिस्त, परस्पर विश्वास आणि संवाद यांना विशेष महत्त्व असते. रोनाल्डोसारख्या अनुभवी खेळाडूच्या बाबतीतही हेच लागू होते. निवृत्तीमागे प्रशिक्षकाशी झालेला वाद हेच कारण असल्याचे त्याने स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे या चर्चांपेक्षा त्याच्या दोन दशकांहून अधिक काळातील योगदानाचे मूल्यमापन करणे अधिक महत्त्वाचे ठरते. आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती घेतली असली, तरी रोनाल्डोची फुटबॉल कारकीर्द अद्याप संपलेली नाही. अल नासर क्लबकडून खेळताना त्याचा हजार गोलचा टप्पा गाठण्याचा प्रयत्न सुरू आहे. ९८९ गोलचा आकडा गाठलेल्या या खेळाडूसमोर आता आणखी एक ऐतिहासिक विक्रम उभा आहे. वयाच्या ४१व्या वर्षीही मैदानावर टिकून राहण्याची त्याची क्षम ता, शारीरिक तंदुरुस्तीबाबतची शिस्त आणि खेळाविषयीची बांधिलकी नव्या पिढीतील खेळाडूंसाठी अभ्यासाचा विषय आहे.

रोनाल्डो आणि लिओनेल मेसी या दोन खेळाडूंनी गेल्या दोन दशकांहून अधिक काळ जागतिक फुटबॉलवर अधिराज्य गाजवले. त्यांच्या चाहत्यांमध्ये कोण श्रेष्ठ, यावर अनेक वर्षे चर्चा रंगल्या. मात्र, या चर्चेपलीकडे जाऊन पाहिले तर या दोघांनी फुटबॉलला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. विक्रम, पुरस्कार, गोल आणि विजेतेपदांच्या स्पर्धेत त्यांनी एकमेकांना आव्हान दिले. या स्पर्धेमुळेच फुटबॉल चाहत्यांना दीर्घकाळ दर्जेदार खेळाचा आनंद घेता आला. आता आंतरराष्ट्रीय स्तरावर रोनाल्डोची अनुप-स्थिती या स्पर्धेतील एका महत्त्वाच्या अध्यायाची समाप्ती दर्शवते. खेळाडू निवृत्त होतात; मात्र त्यांची कामगिरी, संघर्ष आणि प्रेरणा कधीच निवृत्त होत नाही. रोनाल्डोच्या बाबतीतही हेच म्हणता येईल. त्याने पोर्तुगालच्या जर्सीत केलेले गोल, निर्णायक सामन्यांतील कामगिरी, विजयासाठी दाखवलेली जिद्द आणि पराभवानंतर पुन्हा उभे राहण्याची वृत्ती फुटबॉलच्या इतिहासात कायम स्मरणात राहील. त्याची सात क्रमांकाची जर्सी आता दुसऱ्या खेळाडूच्या अंगावर दिसेल; पण त्या जर्सीशी जोडलेल्या आठवणी पुसल्या जाणार नाहीत.

रोनाल्डोचा निरोप हा केवळ एका खेळाडूचा निरोप नाही, तर मेहनत, महत्त्वाकांक्षा आणि आत्मविश्वासाच्या जोरावर इतिहास घडवता येतो, याची आठवण करून देणारा क्षण आहे. विश्वचषकाचे स्वप्न अपूर्ण राहिले, तरी त्याने आपल्या देशाला दिलेली विजेतेपदे आणि जगभरातील चाहत्यांच्या मनात निर्माण केलेले स्थान कमी होणार नाही. मैदानावरील त्याचा प्रवास कदाचित नव्या वळणावर गेला असेल; पण फुटबॉलच्या इतिहासातील रोनाल्डोचे स्थान कायम अढळ राहील. म्हणूनच त्याला अलविदा म्हणताना एकच भावना मनात येते रोनाल्डो, तू खेळातून बाजूला झाला असशील; पण फ ुटबॉलच्या चाहत्यांच्या मनातून कधीच निवृत्त होणार नाहीस!

-मच्छिंद्र ऐनापुरे,
जत जि.सांगली

दिवाळी अंक : वाचकांसाठी साहित्याची पर्वणीच!



दिवाळी जवळ आली की, साहित्यप्रेमी वाचकांना वेध लागतात ते विविध दिवाळी अंकांचे. दिवाळीच्या खरेदीसोबतच पुस्तकांच्या दुकानांकडे वाचकांची पावले वळू लागतात. महाराष्ट्रात दिवाळी अंकांची परंपरा अतिशय समृद्ध आणि जुनी आहे. १९०९ मध्ये 'मनोरंजन' या नियतकालिकाने पहिला दिवाळी अंक प्रकाशित केला. तेव्हापासून सुरू झालेली ही साहित्यपरंपरा आजही तितक्याच उत्साहाने सुरू आहे. दरवर्षी महाराष्ट्रात विविध विषयांवरील शेकडो दिवाळी अंक प्रकाशित होतात.

दिवाळी अंक म्हणजे वाचकांसाठी साहित्याची मेजवानीच! कथा, कविता, कादंबरी, विनोद, व्यंगचित्रे, राजकारण, अर्थकारण, कला, क्रीडा, सामाजिक प्रश्न, शिक्षण, आरोग्य, विज्ञान आणि संस्कृती अशा विविध विषयांचा समृद्ध खजिना दिव-ाळी अंकांमधून वाचायला मिळतो. नामवंत साहित्यिकांपासून नवोदित लेखकांपर्यंत अनेकांना आपल्या लेखनकौशल्याला व्यासपीठ मिळवून देण्याचे महत्त्वाचे काम दिवाळी अंक करतात. अनेक वृत्तपत्रे, नियतकालिके आणि स्वतंत्र प्रकाशकही दरवर्षी दर्जे दार दिवाळी अंक प्रकाशित करतात. त्यामुळे दिवाळीच्या फराळासोबतच दिवाळी अंक हा साहित्यप्रेमी कुटुंबांच्या आनंदाचा अविभाज्य भाग बनला आहे.

दिवाळी अंक हे केवळ मनोरंजनाचे साधन नाहीत, तर ते आपल्या साहित्यिक आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन करणारे म हत्त्वाचे माध्यम आहे. वाचनसंस्कृती रुजवण्यात आणि ती समृद्ध करण्यात दिवाळी अंकांचे योगदान मोठे आहे. विशेषतः नव्या पिढीला पुस्तकांकडे आकर्षित करण्यासाठी दिवाळी अंकांचा उपयोग होऊ शकतो. आज मोबाईल, इंटरनेट आणि समाजमाध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे वाचनाची सवय कमी होत असल्याची चिंता व्यक्त केली जाते. अशा परिस्थितीत मुलांना आणि तरुणांना दर्जेदार दिवाळी अंकांची ओळख करून देणे आवश्यक आहे.

यंदाच्या दिवाळीत आपण मित्रपरिवार, नातेवाईक आणि प्रियजनांना मिठाई, फराळ आणि भेटवस्तू देतानाच एखादा दर्जेदार दिवाळी अंकही भेट द्यावा. ही भेट केवळ कागदांची किंवा पुस्तकांची नसून ज्ञानाची, विचारांची आणि साहित्यिक आनंदाची असेल. गोडाधोडाच्या फराळासोबतच वा-चनाचा हा बौद्धिक फराळही प्रत्येक घरात पोहोचला पाहिजे. कारण दिवाळीचा आनंद केवळ दिव्यांच्या प्रकाशात आणि फराळाच्या गोडव्यात नाही, तर ज्ञानाच्या प्रकाशात आणि साहित्याच्या सहवासातही दडलेला आहे. दिवाळी अंकांचे वाचन वाढले, तर वाचनसंस्कृती अधिक समृद्ध होईल आणि मराठी साहित्यविश्वाची परंपराही अधिक बहरत राहील.

श्याम ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे

दीपावलीच्या पूर्वसंध्येला ७० एकल महिलांना माविमचा स्वावलंबनाचा आधार!

नव तेजस्वीनी योजनेंतर्गत १० लाख ५० हजार रुपयांच्या निधीचे वाटप; संजय वारकड तहसीलदारांच्या हस्ते महिलांना दीपावलीची गोड भेट

नांदेड (प्रतिनिधी)– दीपावलीच्या पूर्वसंध्येला समाजातील एकल महिलांच्या जीवनात आर्थिक स्वावलंबनाची नवी पहाट निर्माण करण्याच्या उद्देशाने महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), नांदेड यांच्या वतीने नव तेजस्वीनी योजनेअंतर्गत एकल महिला सन्मान व स्वावलंबी परतफेड योग्य निधी वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमात नांदेडचे तहसीलदार संजय वारकड यांच्या प्रमुख उपस्थितीत ७० पात्र एकल महिलांना प्रत्येकी १५ हजार रुपये याप्रमाणे एकूण १० लाख ५० हजार रुपयांच्या परतफेड योग्य निधीचे वाटप करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार स्वप्नील दिग्गलवार यांची विशेष उपस्थिती होती. एकल महिला सक्षम झाली, तर कुटुंब सक्षम होईल आणि समाज अधिक सक्षम होईल, असे नायब तहसीलदार स्वप्नील दिग्गलवार यांनी सांगितले.

दीपावलीच्या सणानिमित्त तहसीलदार संजय वारकड यांच्या हस्ते उपस्थित एकल महिलांना स्नेहपूर्वक गोड भेट देऊन दीपावलीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. आर्थिक स्वावलंबनासोबतच सणाच्या आनंदात या महिलांना सहभागी करून घेण्याचा हा उपक्रम उपस्थितांसाठी विशेष आनंदाचा क्षण ठरला.

कार्यक्रमात महिला आर्थिक विकास महामंडळ, नांदेडचे जिल्हा समन्वय अधिकारी अनंत खेत्रे यांनी उपस्थित लाभार्थी महिलांना मार्गदर्शन केले. उपलब्ध करून दिलेल्या निधीचा उपयोग स्वयंरोजगार, लघुउद्योग, घरगुती व्यवसाय, शेतीपुरक व्यवसाय व उत्पन्नवाढीच्या उपक्रमांसाठी करावा. तसेच निधीची नियमित परतफेड करून आर्थिक शिस्त राखावी, असे आवाहन करण्यात आले.

समाजातील एकल महिलांना अनेक आर्थिक व सामाजिक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा महिलांना केवळ सहानुभूती न देता आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. हीच बाब लक्षात घेऊन माविमच्या नव तेजस्वीनी योजनेअंतर्गत हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या निधीच्या माध्यमातून महिलांना स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू करण्यासाठी, उत्पन्नाचे साधन निर्माण करण्यासाठी आणि खासगी सावकार किंवा जास्त व्याजदराच्या कर्जावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आर्थिक पाठबळ मिळणार आहे.

निधी वाटपाचा तपशील : एकूण लाभार्थी : ७० एकल महिला, प्रति लाभार्थी निधी : १५ हजार रुपये, एकूण वितरित निधी : १० लाख ५० हजार रुपये, निधीचे स्वरूप : परतफेड योग्य निधी योजना : नव तेजस्वीनी योजना.

या कार्यक्रमास लोकसंचलित साधन केंद्राच्या अध्यक्षा प्रभावती लोकेवार, चंद्रकलाबाई भुक्तरे यांची उपस्थिती होती. तसेच व्यवस्थापक राहुल शिंदे, रमा दामोधर, नवनाथ फुले, संजय कदम, शशिकला जाधव, शर्मिला वाढवे आणि कविता वायवळे यांच्यासह कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते आ. रोहित पवार यांचा नांदेड दौरा

नांदेड (प्रतिनिधी)– राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते तथा आमदार रोहित पवार शनिवार दिनांक ७ नोव्हेंबर रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.



आमदार रोहित पवार हे सकाळी ७ वाजता येळी गाव ता. अर्धापूर येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी गुणाजी पवार यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट, सकाळी ८ वाजता माळकौठा तालुका मुदखेड येथील मृत्य शेतकरी चंद्रकांत शिंदे यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट तसेच सकाळी १० वाजता मुखेड येथील आत्महत्याग्रस्त गुत्तेदार गजानन देवकत्ते यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेणार आहेत.

नांदेड दौऱ्यादरम्यान आमदार रोहित पवार पीडितांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेणार आहेत, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे मुखेड तालुकाध्यक्ष शिवाजी नागोराव जाधव यांनी दिली आहे.

पैनगंगा प्रकल्पातील पाणी उपशावर प्रशासनाचे कडक नियंत्रण

अवैध मोटार पंप व विद्युत जोडण्या जप्त करण्याचे नांदेड-यवतमाळ जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश



नांदेड (प्रतिनिधी)– दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पैनगंगा प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठ्याचा काटेकोर वापर करून पिण्याच्या पाण्याला प्राधान्य द्यावे. नदीपात्रातून होणारा अनधिकृत पाणी उपसा तातडीने रोखून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. यासंदर्भात नांदेड व यवतमाळ जिल्ह्यांतील संबंधित अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या उपस्थितीत व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात आली.

पाटबंधारे व महावितरण विभागाने नदीपात्रातील पाणी उपशाची दररोज पाहणी करून अनधिकृत मोटार पंप व विद्युत जोडण्या जप्त कराव्यात. गरजेनुसार संबंधित भागातील विद्युत डी. पी. बंद करण्याची कार्यवाही करावी. तसेच नदीकाठच्या गावांतील पोलीस पाटील, तलाठी व ग्रामसेवक यांनी नियमित पाहणी करून अनधिकृत पाणी उपशाची माहिती संबंधित विभागांना द्यावी, असे निर्देश देण्यात आले.

यंदा नदीकाठच्या शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार नसल्याने त्यांनी कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची लागवड करावी आणि ऊसासारखी अधिक पाणी लागणारी पिके टाळावीत, यासाठी जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पिण्याच्या पाण्यासाठी पाणी आरक्षण व चार पाणीपाळ्यांना परवानगी असली तरी पाण्याचा अनधिकृत उपसा अथवा गैरवापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचेही स्पष्ट करण्यात आले.

या बैठकीस दोन्ही जिल्ह्यांचे पाटबंधारे व महावितरण विभागाचे अधीक्षक अभियंता, निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता उपस्थित होते. उपलब्ध पाणीसाठ्याचे प्रभावी नियोजन व काटेकोर अंमलबजावणीसाठी सर्व विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

अभिजीत कोलतेची राज्यस्तरीय विकसित भारत युवा संसदेसाठी निवड

मुदखेड (प्रतिनिधी)– मुदखेड तालुक्यातील मौ. चिलपिंपरी येथील मूळ रहिवाशी अभिजीत संजय कोलते याची



भारत सरकारच्या युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'विकसित भारत युवा संसद' उपक्रमांतर्गत अभिजीत कोलते याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

अभिजीत कोलते याने ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी नांदेड येथे आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धेत 'एक राष्ट्र, एक निवडणूक' या विषयावर सखोल संशोधन केलेले इंग्रजी भाषण देऊन हा सन्मान मिळवला. त्यांच्या या राज्यस्तरीय निवडीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

नांदेडमध्ये लोकसंख्येनुसार शौचालये किती?

आ. राजेश पवार यांचा महापालिकेला जाब

नांदेड (प्रतिनिधी)– महापालिकेने सादर केलेल्या १४६ पानांच्या अहवालानंतर आमदार राजेश पवार यांनी शहरातील सार्वजनिक शौचालयांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. कागदोपत्री संख्या नको, तर लोकसंख्येनुसार किती शौचालये आवश्यक, किती उपलब्ध आणि किती कमी आहेत, याची प्रभागनिहाय माहिती द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

विशेषतः महिला, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र तपासणीची मागणी करताना पवार यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या २०१५ च्या आणि सर्वोच्च न्यायालयाच्या २०२५ च्या निर्णयांची आठवण करून दिली.

सर्व शौचालयांचे स्वच्छता व देखभाल ऑडिट, कंत्राटदारांचे परीक्षण, मागील तीन वर्षांच्या खर्चाचे लेखापरीक्षण, GIS Mapping, QR Code आधारित अभिप्राय प्रणाली आणि डिजिटल तपासणी करण्याची सूचना त्यांनी केली. पाणीटंचाई लक्षात घेऊन Waterless Urinals, Low-Flush Toilets आणि BOT/PPP तत्त्वावर देखभालीचा अभ्यास करावा, असेही त्यांनी सुचविले.

पुढील पाच वर्षांचा मास्टर प्लॅन करा

शहरासाठी Sanitation Gap nalysis करून महिलांच्या शौचालयांचा स्वतंत्र मास्टर प्लॅन तयार करावा. पुढील पाच वर्षांची लोकसंख्या, नवीन वसाहती, बाजारपेठा, बसस्थानक, रुग्णालये आणि गर्दीची ठिकाणे यांचा त्यात समावेश असावा. कमतरता असलेल्या ठिकाणी नवीन शौचालयांसाठी जागा, निधी आणि वेळापत्रक निश्चित करावे, अशी मागणी नायगाव विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे आमदार राजेश पवार यांनी केली आहे.

दुष्काळात सर्वच शेतकऱ्यांचा पिकविमा मंजूर करा; जिल्हाधिकारी यांच्याकडे माजी जि. प. अध्यक्ष दिलीप बेटमोगरेकर यांची मागणी

नांदेड (प्रतिनिधी)– यावर्षी दुष्काळाने शेतकरी होरपळून निघाला आहे. प्रशासन स्तरावरून या परिस्थितीत शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्याची प्रक्रिया चालू आहे. पण आज दुष्काळी परिस्थितीत पिकविमा भरलेल्या शेतकऱ्यांचा पिकविमा मंजूर करण्याची वेळ आली आहे.तेव्हा पिकविमा कंपनी पिकविमा भरलेल्या शेतकऱ्यांच्या पिकविमा अर्जात त्रुटी दाखवून अर्ज रिव्हर्ट करत आहेत. पिकविमा कंपनीला शेतकऱ्यांच्या अर्जातील ज्या त्रुटी दाखवून अर्ज रिव्हर्ट करायचे होते, ते पिकविमा कंपनीने शेतकऱ्यांनी पीकविमा भरल्या काही दिवसात किंवा महिन्यानंतर करायला हवे होते. आज पिकविमा मंजूर करायची वेळ आली तेव्हा पिकविमा कंपनी त्रुटी दाखवून पीकविम्याचे अर्ज रिव्हर्ट करत आहे. यात पिकविमा कंपनीची



त्रुटी काढून शेतकऱ्यांना पीकविम्यापासून वंचित ठेवण्याचा उघड हेतू दिसून येत आहे. दुष्काळी परिस्थितीत पीकविमा कंपनीकडून शेतकऱ्यांवर हेतुपुरस्सर अन्याय होऊ देऊ नये. पिकविमा भरलेल्या सर्वच शेतकऱ्यांना दुष्काळी परिस्थितीत पिकविमा मंजूर करण्याचे आदेश पिकविमा कंपनीला द्यावेत अशी मागणी माजी जि. प. अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर व शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्याकडे निवेदन देऊन केली आहे.

पिकविमा कंपनी अर्ज रिव्हर्ट करताना IFSC कोड नाही, जुळत नाही, पासबुक-सातबारा-खातेक्रमांक स्पष्ट दिसत नाही, शेतकऱ्यांचे-बँकेचे नाव जुळत नाही ही व इतर कारणे देऊन शेतकऱ्यांनी भरलेले पीकविम्याचे अर्ज आज पिकविमा मंजूर करायच्या वेळी त्रुटीत काढत आहेत. जिल्ह्यामध्ये रिव्हर्ट केलेल्या अर्जाची संख्या अंदाजे ५८ ते ५९ हजार एवढी मोठी आहे. या त्रुटीत सत्यता किती आहे? ते प्रत्येक शेतकऱ्यांचे अर्ज पाहून पडताळणे हे अत्यंत जटील आहे, हे पिकविमा कंपनीला माहिती आहे.

पिकविमा द्यायच्या वेळी अशा त्रुटी काढून वेळ मारून नेला की नंतर त्या शेतकऱ्यांना पिकविमा द्यायची गरज पडत नाही. मुद्दा मागे पडून जातो, पिकविमा द्यायचा दबाव कमी होतो,याची पिकविमा कंपनीला खात्री झाली आहे. मागील काही वर्षी पिकविमा कंपनीने काही शेतकऱ्यांना पिकविमा दिला आणि काही शेतकऱ्यांना तो दिलाच नाही. तोच हेतू या अर्ज रिव्हर्ट करण्यामागे आहे. याची चौकशी करून, दुष्काळी परिस्थितीत अर्ज रिव्हर्ट झालेल्या पिकविमाधारक शेतकऱ्यांसह सर्वच पिकविमा भरलेल्या शेतकऱ्यांना पिकविमा मंजूर कारण्याचे आदेश पिकविमा कंपनी देण्याची मागणी निवेदनात केली आहे.

कामनगावात 'सहस्र जलतारा प्रकल्पा'चा शुभारंभ

१५० जलताऱ्यांना शासकीय मंजुरी, ५०० जलताऱ्यांची नोंदणी



भोकर (प्रतिनिधी)– भूगर्भातील दिवसेंदिवस खालावत चाललेली पाणीपातळी, सिंचनाअभावी शेतीसमोर निर्माण झालेल्या समस्या आणि भविष्यातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी भोकर तालुक्यातील कामनगावच्या ग्रामस्थांनी एकजुटीने पुढाकार घेतला आहे. नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात एक लाख जलतारा उभारण्याच्या संकल्पनेला प्रतिसाद देत कामनगावात 'एक हजार जलतारा प्रकल्प' राबविण्याचा निर्धार करण्यात आला आहे. या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा शुभारंभ गावचे माजी सरपंच राघोबा पाटील सोळंके यांच्या हस्ते व गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या उपस्थितीत करण्यात आला.

कामनगाव हे लोकसंख्या व भौगोलिक क्षेत्राच्या दृष्टीने लहान गाव असले तरी शेतीतील नवनवीन प्रयोग आणि कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठी येथील शेतकरी सातत्याने प्रयत्नशील आहेत. गावात पूर्वी मोजकेच ट्रॅक्टर होते, आज जवळपास वीस ट्रॅक्टर शेतीच्या कामात कार्यरत आहेत. पारंपरिक पिकांसोबत नगदी पिकांकडेही शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. मात्र, सिंचनासाठी पुरेसे पाणी उपलब्ध नसल्याने शेतीच्या विकासाला मर्यादा येत आहेत. गावातील अनेक विहिरी व विंधन विहिरींची पाणीपातळी मोठ्या प्रमाणात घटली असून भूगर्भातील पाणी सुमारे सहाशे फूट खोल गेल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

या गंभीर परिस्थितीवर मात करण्यासाठी गावातील रहिवासी असलेले सेवानिवृत्त मुख्याध्यापक संजय देशमुख कामंगावकर शिक्षण क्षेत्रातून सेवानिवृत्त झाल्यानंतर गावकऱ्यांची सेवा करण्याच्या निर्धार केला.

दुष्काळग्रस्त परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर वडार समाजाला तत्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी

हदगाव (प्रतिनिधी)– महाराष्ट्र राज्यातील वडार समाजाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता दुष्काळग्रस्त परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर वडार समाजाला तत्काळ विशेष आर्थिक मदत जाहीर करावी, तसेच पैलवान मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करून समाजातील नागरिकांना तातडीने कर्जवाटप करावे, अशी मागणी वीर वडार एकता फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली

यासंदर्भात वीर वडार एकता फाउंडेशनचे नांदेड जिल्हाध्यक्ष साहेबराव बालाजी मेटकर व हिमायतनगर तालुका अध्यक्ष साहेबराव चव्हाण, हदगाव तालुका अध्यक्ष साहेबराव देवकर, शहर अध्यक्ष बजरंग बाभुळकर हे सुद्धा उपस्थित होते.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर केले असून, निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रातील वडार समाज हा आजही आर्थिक, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आहे. समाजातील बहुतांश कुटुंबे मजुरी, दगड फोडणे, बांधकाम व्यवसाय, हातगाडी व इतर असंघटित कामांवर उदरनिर्वाह करतात. सध्याच्या दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे रोजगाराच्या संधी कमी झाल्या असून, अनेक वडार कुटुंबांवर उपासमारीचे संकट ओढवले आहे. वाढती महागाई, बेरोजगारी आणि आर्थिक अडचणींमुळे गरीब कुटुंबांचे जगणे कठीण झाले आहे. वडार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने विशेष लक्ष देऊन तातडीने आर्थिक मदतीचे पॅकेज जाहीर करून दुष्काळग्रस्त परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर वडार समाजाला तत्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.

वडार समाज अनेक वर्षांपासून आर्थिक विकासाच्या प्रतीक्षेत आहे. त्यामुळे शासनाने या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून सकारात्मक निर्णय घ्यावा अन्यथा समाजाच्या न्याय्य मागण्यांसाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

पान १ वरून...

खा. अशोकराव चव्हाण...

साखर कारखान्याचे अध्यक्ष नरेंद्र चव्हाण आदी उपस्थित होते.

सध्या देशातील संवैधानिक संस्थांविषयी विरोधी पक्षांकडून सातत्याने संशय आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण केले जात असल्याच्या पार्श्वभूमीवर खा. अशोकराव चव्हाण यांनी या संवादात विविध विषयांवरील वस्तुस्थिती मांडली. लोकशाही बळकट ठेवण्यासाठी नागरिकांमध्ये तथ्यांविषयी सजगता निर्माण करण्याची आवश्यकता त्यांनी विशद केली. निवडणूक प्रक्रियेशी निगडित असलेल्या मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेबाबत विरोधकांचे आरोप खोडून काढत समाजातील प्रभावशाली व्यक्तींनी या विषयी जनजागृती करावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या संचालनाची जबाबदारी शीतल खांडिल यांनी सांभाळली.

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेंडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



मॉडर्न इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस पाठविला निधी



उमरी (प्रतिनिधी)– उमरी येथील मॉडर्न इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर वर्गणी करून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ८०२१ रुपयांचा निधी पाठविला आहे.

सध्या महाराष्ट्रातील अनेक भागात पावसाने दडी मारल्यामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत आपणही मदतीचा हात दिला पाहिजे, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सहकार्य केले पाहिजे ह्या उदात्त हेतूने मॉडर्न इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्यांनी निधी संकलित करून ८०२१ रुपयांच्या निधीचा डी. डी. उमरी तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार एस. पी. सोलनकर आणि तेजस कुलकर्णी यांचेकडे सुपूर्द केला. दरवर्षी दिवाळीनिमित्त शाळेमध्ये उत्सव साजरा करण्यात येतो. परंतु यावर्षी महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट असतांना विद्यार्थ्यांनी दिवाळी उत्सव साजरा न करता आपल्या फटाक्यासाठीची रक्कम दुष्काळग्रस्तासाठी देऊन आपला खारीचा वाटा उचलत सामाजिक बांधिलकी जोपासली. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, मुख्याध्यापिका सौ. अनुराधा कुलकर्णी, शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

बिलोलीत सीटी स्कॅन; कुंडलवाडी व देगलूरमध्ये ५० खाटांचे महिला रुग्णालय सुरू करण्याची मागणी

आरोग्य सुविधांसाठी आ. जितेश अंतापूरकर यांचा शासनदरबारी पाठपुरावा

शंकरनगर (प्रतिनिधी)– देगलूर - बिलोली विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण आणि सीमावर्ती भागातील आरोग्य सुविधांचा प्रश्न ऐरणीवर आला असून, नागरिकांना दर्जेदार व वेळेवर वैद्यकीय उपचार मिळावेत यासाठी आमदार जितेश अंतापूरकर यांनी शासनदरबारी विविध मागण्यांचा पाठपुरावा सुरू केला आहे. सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत नांदेड जिल्ह्यातील आरोग्य विभागाच्या पदाधिकारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत आयोजित विशेष 'आरोग्य संवाद' बैठकीत आमदार अंतापूरकर यांनी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे सहभाग घेत मतदारसंघातील आरोग्यविषयक प्रश्न मांडले.

या बैठकीत त्यांनी देगलूर येथे ५० खाटांचे स्वतंत्र महिला रुग्णालय, बिलोली येथे सीटी स्कॅन सुविधा, कुंडलवाडी उपजिल्हा रुग्णालयाचे रखडलेले लोकार्पण, १०० खाटांच्या रुग्णालयासाठी मंजूर निधीचे वितरण तसेच ग्रामीण रुग्णालयांमध्ये २४ तास डॉक्टरांची उपलब्धता या महत्त्वपूर्ण मागण्यांकडे आरोग्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

देगलूर व परिसरातील महिलांना प्रसूती, स्त्रीरोग आणि इतर आरोग्यविषयक उपचारांसाठी स्वतंत्र व सुसज्ज रुग्णालयाची आवश्यकता आहे. त्यामुळे देगलूर येथे ५० खाटांचे विशेष महिला रुग्णालय मंजूर करून त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार अंतापूरकर यांनी केली.

अपघात, मेंदूला झालेली दुखापत आणि गंभीर आजारांच्या निदानासाठी सीटी स्कॅन अत्यंत महत्त्वाचे आहे. बिलोली परिसरातील रुग्णांना या तपासणीसाठी नांदेड किंवा हैदराबाद गाठावे लागत आहे. लांबचा प्रवास, आर्थिक खर्च आणि उपचारास होणारा विलंब यामुळे रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे बिलोली येथील शासकीय रुग्णालयात सीटी स्कॅन मशीन तातडीने उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

कुंडलवाडी येथील उपजिल्हा रुग्णालय मंजूर होऊन दोन वर्षांचा कालावधी उलटला असतानाही आवश्यक डॉक्टर, परिचारिका, तंत्रज्ञ आणि वैद्यकीय साहित्याअभावी रुग्णालयाचे लोकार्पण रखडले आहे. इमारत उभी असताना आरोग्यसेवा सुरू होण्याची प्रतीक्षा नागरिकांना करावी लागत आहे. त्यामुळे आवश्यक मनुष्यबळ व वैद्यकीय साहित्य तातडीने उपलब्ध करून रुग्णालय सुरू करावे, अशी मागणी आमदारांनी केली.

मतदारसंघातील १०० खाटांच्या सुसज्ज रुग्णालयासाठी निधी मंजूर झाल्याबद्दल त्यांनी शासनाचे आभार मानले. मात्र, प्रशासकीय व तांत्रिक अडचणींमुळे निधी वितरणाची प्रक्रिया रखडल्याने पुढील कामांना विलंब होत आहे. हे अडथळे दूर करून मंजूर निधी तातडीने वितरित करावा, अशी मागणीही त्यांनी केली.

जाहीर प्रगटन

मौजे शाहुनगर, हडको नांदेड हद्दीतील गट नं. १०७ प्लॉट नं. २२ साईज ९९० चौ.फुटाचा प्लॉट सौ. कलावतीबाई हरि बोंडलवाड रा. मु.पो.कौठा ता. कंधार जि. नांदेड यांचेकडून सौ. आशा कमलाकर भद्रे रा. बाजीराव नगर, नालंदा नगर, नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतुःसिमा- पूर्वेस - प्लॉट नं. ३.४ मीटर रस्ता, पश्चिमेस - प्लॉट नं. १८, दक्षिणेस - ४.८७ मीटर रूंद रस्ता व उत्तरेस - प्लॉट नं. २३.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत सौ. आशा कमलाकर भद्रे यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

जाहीर प्रगटन देणार
सौ. आशा कमलाकर भद्रे
रा. बाजीराव नगर, नालंदा नगर, नांदेड
मो.नं. ९८८१४१४९२२

तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

नळ सुरू करताच मिळणार गरम पाणी!

टाकीविरहित गीझर कसे काम करते? किंमत अन् फायदे जाणून घ्या...

हिवाळ्यात गीझर सुरू केल्यानंतर पाणी गरम होण्याची वाट पाहावी लागते. मात्र, नळ सुरू करताच गरम पाणी मिळाले तर? ही सुविधा टाकीविरहित अर्थात 'टँकलेस गीझर'मुळे शक्य होते. पारंपरिक गीझरच्या तुलनेत आकाराने लहान असलेले हे गीझर कमी जागेत बसवता येते. विशेष म्हणजे, यात पाणी साठवण्यासाठी स्वतंत्र टाकी नसते. त्यामुळे गरजेनुसार वाहते पाणी तत्काळ गरम करता येते. नवीन गीझर खरेदी करण्याचा विचार करत असाल, तर टँकलेस गीझर हा एक पर्याय ठरू शकतो. मात्र, त्याची कार्यपद्धती, किंमत, फायदे आणि मर्यादा समजून घेणे आवश्यक आहे.



टँकलेस गीझर म्हणजे काय?

नावावरूनच स्पष्ट होते की, टँकलेस गीझरमध्ये पाणी साठवण्यासाठी स्वतंत्र टाकी नसते. पारंपरिक गीझरमध्ये साधारणपणे ३ ते २५ लिटर किंवा त्याहून अधिक क्षमतेची पाण्याची टाकी असते. मात्र, टँकलेस गीझरमध्ये अशी टाकी नसल्यामुळे त्याचा आकार तुलनेने लहान असतो. त्यामुळे बाथरूममध्ये कमी जागेतही ते बसवता येते. या गीझरचे वैशिष्ट्य म्हणजे ते पाणी साठवून ठेवत नाही, तर नळातून वाहणारे पाणी गरजेनुसार तत्काळ गरम करते. त्यामुळे पाणी गरम होण्यासाठी आधीपासून गीझर सुरू ठेवण्याची किंवा बराच वेळ प्रतीक्षा करण्याची गरज भासत नाही.

टँकलेस गीझर कसे काम करते?

» नळ सुरू करताच यंत्रणा सक्रिय : घरातील नळ सुरू केल्यानंतर गीझरमधील प्रवाह संवेदक (फ्लो सेन्सर) पाण्याचा प्रवाह ओळखतात आणि यंत्रणा सुरू होते.

» पाणी तत्काळ गरम : त्यानंतर उच्च क्षमतेच्या विद्युत तापक घटकातून (हीटिंग एलिमेंट) किंवा उष्णता विनिमयकातून (हीट एक्सचेंजर) पाणी पुढे जाते. या प्रक्रियेत वाहते पाणी काही सेकंदांत गरम होते.

» नळ बंद केल्यावर यंत्रणा बंद : पाण्याचा प्रवाह थांबताच संवेदक हीटिंग एलिमेंटचा वीजपुरवठा बंद करतात. त्यामुळे गरज नसताना पाणी गरम करण्यासाठी वीज खर्च होत नाही.

टँकलेस गीझरची किंमत किती?

भारतीय बाजारपेठेत टँकलेस गीझरची सुरुवातीची किंमत साधारण २,५०० ते ५,००० रुपयांपर्यंत असू शकते. या श्रेणीतील बहुतांश गीझरची क्षमता ३ ते ४.५ किलोवॅट असते, तर नामांकित कंपन्यांची प्रीमियम श्रेणीतील गीझर साधारण ५.५ किलोवॅट किंवा त्याहून अधिक क्षमतेची असतात. त्यांची किंमत अंदाजे ६,००० ते १२,००० रुपयांपर्यंत असू शकते. कंपनी, क्षमता, वैशिष्ट्ये आणि उपलब्ध सुविधांनुसार किमतीत फरक पडू शकतो. खरेदी करताना केवळ किंमत न पाहता वीजवापर, पाण्याचा प्रवाह आणि घरातील विद्युत जोडणीची क्षमता तपासणेही महत्त्वाचे आहे.

टँकलेस गीझर कुठे वापरणे फायदेशीर?

» स्वयंपाकघरात : भांडी धुण्यासाठी सतत गरम पाण्याची आवश्यकता असते. त्यामुळे स्वयंपाकघरातील नळासाठी हे गीझर उपयुक्त ठरू शकते.

» लहान बाथरूममध्ये : मोठे गीझर बसवण्यासाठी पुरेशी जागा नसलेल्या घरांमध्ये टँकलेस गीझरचा पर्याय विचारात घेता येतो.

» कमी सदस्य असलेल्या कुटुंबांसाठी : दोन ते तीन सदस्य असलेल्या कुटुंबांना गरजेनुसार त्वरित गरम पाणी हवे असल्यास हे गीझर उपयोगी ठरू शकते.

या गोष्टी लक्षात ठेवा...

» टँकलेस गीझरचे काही फायदे असले, तरी खरेदी करण्यापूर्वी काही महत्त्वाच्या बाबी तपासणे आवश्यक आहे.

» विद्युत जोडणी सक्षम असावी : टँकलेस गीझर पाणी वेगाने गरम करण्यासाठी कमी वेळेत जास्त विद्युत शक्ती वापरते. त्यामुळे त्याच्या क्षमतेनुसार योग्य विद्युत जोडणी, पुरेशा जाडीच्या तारा, स्वतंत्र विद्युत परिपथ आणि योग्य क्षमतेचे संरक्षक उपकरण असणे आवश्यक आहे. काही मॉडेलसाठी १६ ते २० अँपिअरची जोडणी आवश्यक असू शकते. मात्र, प्रत्यक्ष गरज उत्पादकाच्या सूचनांनुसार आणि पात्र इलेक्ट्रिशियनच्या सल्ल्याने ठरवावी.

» पाण्याचा दाब महत्त्वाचा : घरातील नळातून पाणी अतिवेगाने किंवा मोठ्या प्रवाहाने येत असल्यास काही मॉडेल्सना ते अपेक्षित तापमानापर्यंत गरम करणे कठीण जाऊ शकते. त्यामुळे खरेदीपूर्वी गीझरची पाणी गरम करण्याची क्षमता तपासावी.

» थंड प्रदेशात मर्यादा : अतिथंड किंवा डोंगराळ भागात येणाऱ्या पाण्याचे तापमान खूप कमी असते. अशा वेळी कमी क्षमतेच्या टँकलेस गीझरमधून अपेक्षित तापमानाचे गरम पाणी मिळेलच असे नाही. त्यामुळे स्थानिक हवामान आणि गीझरची क्षमता यांचा विचार करावा.

टँकलेस गीझर घ्यावे का?

कमी जागेत बसणारे, गरजेनुसार त्वरित गरम पाणी देणारे आणि पाणी साठवण्याची आवश्यकता नसलेले गीझर हवे असल्यास टँकलेस गीझर हा चांगला पर्याय ठरू शकतो. विशेषतः स्वयंपाकघरातील नळ किंवा मर्यादित वापरासाठी त्याचा फायदा होऊ शकतो. मात्र, संपूर्ण कुटुंबासाठी आंघोळीच्या वेळी मोठ्या प्रमाणात गरम पाणी आवश्यक असल्यास गीझरची क्षमता, पाण्याचा प्रवाह आणि येणाऱ्या पाण्याचे तापमान यांचा विचार करणे गरजेचे आहे. योग्य क्षमतेचे मॉडेल निवडल्यासच या गीझरचा अपेक्षित फायदा मिळू शकतो.

फायबर की केबल की ब्रॉडबँड सेवा?

घरासाठी कोणते वाय-फाय कनेक्शन ठरेल फायदेशीर? वेग, किंमत अन् सुविधांमधील फरक जाणून घ्या!

घरात वाय-फाय इंटरनेट कनेक्शन बसवायचे असल्यास फायबर ब्रॉडबँड आणि केबल ब्रॉडबँड असे दोन प्रमुख पर्याय उपलब्ध असतात. यापैकी कोणते कनेक्शन निवडावे, असा प्रश्न अनेकांना पडतो. फायबर इंटरनेट वेगवान आणि अधिक स्थिर कनेक्शनसाठी ओळखले जाते, तर केबल ब्रॉडबँडची उपलब्धता तुलनेने अधिक असून त्याचे जाळे अनेक भागांत विस्तारलेले आहे. मात्र, केवळ इंटरनेटचा वेग पाहून कनेक्शन निवडणे योग्य ठरणार नाही. त्यासाठी दोन्ही तंत्रज्ञानांमधील फरक, खर्च, अपलोड आणि डाउनलोडचा वेग तसेच आपल्या वापराच्या गरजा समजून घेणे आवश्यक आहे.



सर्वप्रथम दोन्ही तंत्रज्ञानांमधील फरक समजून घ्या


» फायबर ब्रॉडबँड : या तंत्रज्ञानामध्ये काचेच्या किंवा विशेष प्लास्टिकच्या अतिसूक्ष्म तंतूंचा वापर केला जातो. या तंतूंमधून प्रकाशाच्या साहाय्याने माहितीचे वहन केले जाते. त्यामुळे अतिशय वेगाने माहिती पाठवणे आणि प्राप्त करणे शक्य होते.

» केबल ब्रॉडबँड : या कनेक्शनमध्ये प्रामुख्याने कोअॅक्सियल केबलचा वापर केला जातो. या केबलमध्ये तांब्याच्या वाहकाच्या माध्यमातून विद्युत संकेतांद्वारे माहितीचे वहन होते.

» हवामानाचा परिणाम : केबल ब्रॉडबँडमध्ये बाह्य केबल जाळ्याची गुणवत्ता, जोडणी आणि देखभाल यानुसार पावसाळ्यात किंवा खराब हवामानात अडथळे निर्माण होऊ शकतात. फायबर केबल विद्युत चुंबकीय हस्तक्षेपामुळे प्रभावित होत नाही. मात्र, प्रत्यक्ष सेवेत केबलचे नुकसान किंवा पायाभूत सुविधांमधील बिघाड झाल्यास दोन्ही प्रकारच्या इंटरनेट सेवांवर परिणाम होऊ शकतो.

अंतिम निर्णय घेताना काय लक्षात ठेवावे?

एकंदरीत वेगवान इंटरनेट, अधिक स्थिर जोडणी, ऑनलाइन गेमिंग, व्हिडिओ कॉलिंग आणि घरून काम करण्यासाठी फायबर ब्रॉडबँडला प्राधान्य देता येईल. मात्र, सामान्य इंटरनेट वापर, कमी खर्च आणि केबल टीव्हीसोबत एकत्रित सुविधा हवी असल्यास केबल ब्रॉडबँडही चांगला पर्याय ठरू शकतो. थोडक्यात सांगायचे तर, उत्तम वेग आणि कामगिरीसाठी फायबर ब्रॉडबँड निवडणे फायदेशीर ठरते; मात्र कनेक्शनची उपलब्धता, मासिक शुल्क आणि आपल्या गरजा लक्षात घेऊनच अंतिम निर्णय घ्यावा.



कोणते कनेक्शन देते अधिक चांगला वेग?

इंटरनेटच्या कामगिरीचा विचार करता फायबर ब्रॉडबँडला अनेकदा प्राधान्य दिले जाते. याचे प्रमुख कारण म्हणजे त्यामध्ये अपलोड आणि डाउनलोडचा वेग समान असण्याची सुविधा उपलब्ध असू शकते. याला 'सममितीय वेग' (Symmetrical Speed) असे म्हणतात. उदाहरणार्थ, एखाद्या फायबर प्लॅनमध्ये डाउनलोडचा वेग १०० एमबीपीएस असल्यास अपलोडचाही वेग १०० एमबीपीएस मिळू शकतो. त्यामुळे मोठ्या आकाराच्या फाइल्स पाठवणे, व्हिडिओ अपलोड करणे आणि ऑनलाइन कामे करणे अधिक सोयीचे होते. दुसरीकडे, केबल ब्रॉडबँडमध्ये डाउनलोडचा वेग अनेकदा अपलोडच्या वेगापेक्षा जास्त असतो. तसेच काही केबल नेटवर्कमध्ये उपलब्ध बँडविड्थ अनेक वापरकर्त्यांमध्ये विभागली जाते. त्यामुळे संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत किंवा अधिक वापरकर्ते इंटरनेट वापरत असताना वेग कमी होण्याची शक्यता असते. फायबर कनेक्शनमध्येही प्रत्यक्ष वेग हा इंटरनेट सेवा पुरवठादाराचा प्लॅन, नेटवर्कची क्षमता आणि वापराच्या परिस्थितीवर अवलंबून असतो.

कोणते कनेक्शन महाग आणि कोणते स्वस्त?

» इंटरनेट कनेक्शन निवडताना मासिक शुल्काबरोबरच उपकरणांचा खर्च आणि अतिरिक्त सुविधांचाही विचार करावा लागतो.

» फायबर कनेक्शन : फायबर इंटरनेट नेहमीच महाग असते असे नाही. अनेक खासगी इंटरनेट सेवा पुरवठादार तुलनेने परवडणाऱ्या दरांत उच्च वेगाचे प्लॅन उपलब्ध करून देतात. या कनेक्शनसाठी ओएनटी (ONT - Optical Network Terminal) या उपकरणाचा वापर केला जातो. अनेक कंपन्या हे उपकरण प्लॅनसोबत विनामूल्य किंवा भाडेतत्त्वावर देतात.

» केबल ब्रॉडबँड : या कनेक्शनसाठी मॉडेम आणि राऊटरची आवश्यकता असते. ही उपकरणे इंटरनेट सेवा पुरवठादाराकडून भाड्याने घेता येतात किंवा स्वतंत्रपणे खरेदी करता येतात.

» टीव्ही आणि लँडलाइन सुविधा : केबल ब्रॉडबँडसोबत अनेकदा केबल टीव्ही आणि दूरध्वनी सेवांचे एकत्रित पॅकेज उपलब्ध होते. त्यामुळे एकाच पॅकेजमध्ये अनेक सुविधा मिळू शकतात.

» ओटीटी सुविधा : काही फायबर इंटरनेट सेवा पुरवठादारही इंटरनेट प्लॅनसोबत ओटीटी सदस्यत्व आणि इंटरनेटवर आधारित दूरचित्रवाणी सेवा देतात. त्यामुळे कनेक्शन निवडताना केवळ मासिक शुल्क न पाहता त्यामध्ये मिळणाऱ्या सुविधा आणि उपकरणांचा खर्चही तपासावा.

तुम्ही कोणते वाय-फाय कनेक्शन निवडावे?

» ऑनलाइन गेमिंगसाठी : तुम्ही नियमित ऑनलाइन गेम खेळत असाल, तर फायबर ब्रॉडबँडचा विचार करावा. कमी विलंब (Latency), स्थिर वेग आणि चांगली अपलोड क्षमता यामुळे गेमिंगचा अनुभव अधिक चांगला मिळू शकतो.

» व्हिडिओ कॉलिंग आणि घरून काम करण्यासाठी : कार्यालयीन बैठका, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, मोठ्या फाइल्स पाठवणे आणि घरून काम करण्यासाठी फायबर कनेक्शन अधिक उपयुक्त ठरू शकते.

» सामान्य इंटरनेट वापरासाठी : तुमचा वापर केवळ संकेतस्थळे पाहणे, समाजमाध्यमे वापरणे आणि ऑनलाइन चित्रपट किंवा व्हिडिओ पाहण्यापुरता मर्यादित असेल, तर केबल ब्रॉडबँडही पुरेसे ठरू शकते.

» केबल टीव्हीसोबत पॅकेज हवे असल्यास : इंटरनेटसोबत दूरचित्रवाणी आणि दूरध्वनी सेवांचे एकत्रित पॅकेज हवे असल्यास केबल ब्रॉडबँडचा पर्याय तपासता येईल.

तुम्ही कोणते वाय-फाय कनेक्शन निवडावे?

» ऑनलाइन गेमिंगसाठी : तुम्ही नियमित ऑनलाइन गेम खेळत असाल, तर फायबर ब्रॉडबँडचा विचार करावा. कमी विलंब (Latency), स्थिर वेग आणि चांगली अपलोड क्षमता यामुळे गेमिंगचा अनुभव अधिक चांगला मिळू शकतो.

» व्हिडिओ कॉलिंग आणि घरून काम करण्यासाठी : कार्यालयीन बैठका, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, मोठ्या फाइल्स पाठवणे आणि घरून काम करण्यासाठी फायबर कनेक्शन अधिक उपयुक्त ठरू शकते.

» सामान्य इंटरनेट वापरासाठी : तुमचा वापर केवळ संकेतस्थळे पाहणे, समाजमाध्यमे वापरणे आणि ऑनलाइन चित्रपट किंवा व्हिडिओ पाहण्यापुरता मर्यादित असेल, तर केबल ब्रॉडबँडही पुरेसे ठरू शकते.

» केबल टीव्हीसोबत पॅकेज हवे असल्यास : इंटरनेटसोबत दूरचित्रवाणी आणि दूरध्वनी सेवांचे एकत्रित पॅकेज हवे असल्यास केबल ब्रॉडबँडचा पर्याय तपासता येईल.

सुट्ट्यांचा आनंद घ्या निश्चिंतपणे!

Gmail चे 'व्हेकेशन रिस्पॉन्डर' सांभाळेल तुमचा 'इनबॉक्स'; आलेल्या संदेशांना आपोआप मिळणार उत्तर

डिजिटल युगात प्रत्येक ई-मेलला वेळेत उत्तर देणे महत्त्वाचे झाले आहे. मात्र, कामाचा व्याप, व्यस्त दिनक्रम किंवा सुट्ट्यांमुळे प्रत्येक ई-मेलला त्वरित उत्तर देणे शक्य होत नाही. विशेषतः दीर्घ सुट्टीवर असताना कार्यालयीन ई-मेलकडे वारंवार लक्ष देणे अनेकांना अडचणीचे ठरते. अशा वेळी गुगलच्या Gmail या ई-मेल सेवेतील 'व्हेकेशन रिस्पॉन्डर' (Vacation Responder) हे वैशिष्ट्य उपयुक्त ठरते. या सुविधेमुळे ठरावीक कालावधीत तुमच्या ई-मेलवर येणाऱ्या संदेशांना आपोआप उत्तर पाठवता येते. त्यामुळे प्रत्येक ई-मेल उघडून स्वतंत्रपणे उत्तर देण्याची गरज राहत नाही. तुम्ही सुट्टीवर असल्याची माहिती, पुन्हा कामावर रुजू होण्याची तारीख आणि संपर्क साधण्याबाबतचा संदेश आधीच तयार करून ठेवू शकता.

'व्हेकेशन रिस्पॉन्डर' वैशिष्ट्य कसे उपयोगी ठरते?

Gmail मधील हे अंगभूत वैशिष्ट्य वापरकर्त्यांना ठरावीक तारखांदरम्यान स्वयंचलित उत्तर पाठवण्याची सुविधा देते. यासाठी वापरकर्त्याला सुरुवातीची आणि शेवटची तारीख निश्चित करता येते. तसेच, ई-मेलचा विषय आणि पाठवायचा संदेशही स्वतः लिहिता येतो. उदाहरणार्थ, तुम्ही सुट्टीवर असाल, तर संबंधित संदेशामध्ये तुम्ही कधी परतणार आहात, तोपर्यंत तातडीच्या कामासाठी कोणाशी संपर्क साधावा किंवा ई-मेलला उत्तर देण्यास विलंब का होऊ शकतो, याची माहिती देऊ शकता.

सुविधेची महत्त्वाची वैशिष्ट्ये...

» स्वयंचलित उत्तर : ठरवलेल्या कालावधीत ई-मेल प्राप्त झाल्यानंतर त्याला स्वयंचलित उत्तर पाठवले जाते.

» कालावधी निश्चित करण्याची सुविधा : कोणत्या तारखेपासून ही सुविधा सुरू करायची आणि कधी बंद करायची, हे ठरवता येते.

» स्वतःचा संदेश लिहिण्याची मुभा : ई-मेलचा विषय आणि उत्तराचा मजकूर स्वतः तयार करता येतो.

» निवडक व्यक्तींना उत्तर : स्वयंचलित उत्तर केवळ संपर्क यादीतील व्यक्तींनाच पाठवण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

» विविध उपकरणांवर उपलब्ध : संगणक, अँड्रॉइड मोबाइल आणि आयफोनवरूनही हे वैशिष्ट्य सुरू करता येते.

कसे सुरू कराल?

सर्वप्रथम Gmail खाते उघडा आणि सेटिंग्जमध्ये जा. त्यानंतर 'जनरल' (General) हा पर्याय निवडा. पेज खाली सरकवा. त्यानंतर 'व्हेकेशन रिस्पॉन्डर' (Vacation Responder) हा पर्याय शोधून तो सुरू करा. आता ही सुविधा कोणत्या तारखेपासून सुरू करायची आणि कोणत्या तारखेपर्यंत सुरू ठेवायची, हे निश्चित करा. त्यानंतर ई-मेलचा विषय (Subject) आणि स्वयंचलित उत्तराचा संदेश लिहा. पुढे स्वयंचलित उत्तर कोणाला पाठवायचे, हे निवडा. केवळ संपर्क यादीतील व्यक्तींना किंवा सर्वांना उत्तर पाठवण्याचा पर्याय निवडता येतो. सर्व माहिती भरल्यानंतर 'सेव्ह चेंजेस' (Save Changes) या पर्यायावर क्लिक करा. यानंतर निर्धारित कालावधीत येणाऱ्या ई-मेलना Gmail कडून स्वयंचलित उत्तर पाठवले जाईल.

या गोष्टी लक्षात ठेवा

संगणक, अँड्रॉइड मोबाइल आणि आयफोन या तिन्ही उपकरणांवरून ही सुविधा सुरू करता येते. सुट्टी संपल्यानंतर किंवा स्वयंचलित उत्तराची आवश्यकता नसल्यास ही सुविधा बंद करता येते. Gmail मधील तुमची ई-मेल स्वाक्षरी (Signature) असल्यास ती स्वयंचलित उत्तराच्या शेवटी दिसू शकते. 'व्हेकेशन रिस्पॉन्डर' सुरू केल्यानंतर Gmail च्या इनबॉक्सच्या वरच्या बाजूला यासंबंधी सूचना दर्शवणारा संदेश दिसतो. ठरवलेला कालावधी संपण्यापूर्वीच ही सुविधा बंद करायची असल्यास त्या सूचनेतील 'एंड नाऊ' (End Now) या पर्यायावर क्लिक करता येते. थोडक्यात सांगायचे तर, सुट्टीच्या काळात किंवा कामाच्या व्यस्त वेळापत्रकात प्रत्येक ई-मेलला स्वतंत्रपणे उत्तर देण्याची कसरत टाळण्यासाठी Gmail चे 'व्हेकेशन रिस्पॉन्डर' वैशिष्ट्य उपयुक्त आहे. एकदा योग्य संदेश आणि कालावधी निश्चित केला की, ई-मेलला स्वयंचलित उत्तर देण्याची जबाबदारी Gmail सांभाळते. त्यामुळे तुम्हाला सुट्ट्यांचा आनंद अधिक निश्चिंतपणे घेता येतो.

प्रारंभिक अधिसूचना कलम-11

भूसंपादन पा.त.ल.सि.का. क्र. 2 नांदेड
क्रमांक : क्र. 2026/02
दिनांक : 31.08.2026

भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013

क्रमांक : क्र. 2026/02 ज्याअर्थी, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 (2013 चा 30) याच्या कलम 3 च्या खंड (इ) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसुचना महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण 11/2014/प्र.क्र.77/अ-2, दिनांक 19 सप्टेंबर, 2015 (यात या पुढे जिचा निर्देश उक्त अधिसुचना असा करण्यात आला आहे.) याव्दारे असे अधिसुचित केलें आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 3 खंड (झेड ओ) असे व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी एखादया जिल्हयातील 10,000 हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या नांदेड जिल्हयाच्या जिल्हाधिकारयास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात पुढे जिचा निर्देश उक्त "सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनूसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम (1) च्या तरतुदीन्वये याव्दारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमीनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, या सोबत जोडलेल्या अनुसुची तीन मध्ये दिलेली आहेत. आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसुची चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम 43 च्या पोट कलम (1) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, या सोबत जोडलेल्या अनुसुची पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम 4 अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण हाईल त्या कालावधीपर्यत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमीनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु उक्त जमीनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी कारणे नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम (5) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, 2013 (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे) यांच्या नियम 10 च्या उप नियम (3) व्दारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी यांनी उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी भूसंपादन पा.त.ल.सि.का. क्र. 2 नांदेड यास पदनिर्देशित केले आहे.

अनुसूची - एक

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

गाव: मौ. रामानाईक तांड तालुका: कंधार जिल्हा: नांदेड

अनुक्रमांक	भूमापन किंवा गट क्रमांक	संपादित क्षेत्र हे. आर
1	211	0.09
2	212	0.20
3	213	0.18
4	214	0.22
5	215	0.06
6	216	1.36
7	217	0.31
8	218	0.10
9	219	0.03
10	220	2.87
11	221	0.01
12	248	0.19
एकूण		5.62

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव	नरपटवाडी पाझर तलाव
प्रकल्प कार्यालयाचे वर्णन (संपादक संस्था)	कार्यकारी अभियंता, मृद व जलसंधारण विभाग नांदेड

अनुसूची - तीन

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

अनुसूची - चार

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश

लागू नाही.

अनुसूची - पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

भूधारकाचे विस्थापन होत नसल्यामुळे प्रशासक नियुक्ती लागू नाही.

टिप: उक्त जमिनीच्या आराखड्याचे (भूसंपादन अधिकारी) कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

ठिकाण:
दिनांक: 31.08.2026

संतोषी देवकुळे
भूसंपादन पा.त.ल.सि.का. क्र. 2 नांदेड
Deputy Collector (Land Acquisition)
P.T.M.I.W. No.2, Nanded.

जिमाका/नां/जाहिरात/105 2026/2027

जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
(भुसुधार शखा)
जा.क्र.२०२६/साशा-१/भुसुधार/सिलिंग/टे-८-१/सीआर-९५ (ई.रि.नं.९५९५०५१) दि. निम्नस्वाक्षरीत/-

प्रपत्र-३
जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार- **दिगांबर लक्ष्मण येम्मेवार रा.चिरली ता.विलोली जि.नांदेड** यांनी **मौजे चिरली ता. देगलुर येथील शेत स,नं,/गट क्र.१९३ मधील ०० हे.९६ आर.** महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ सुधारीत नियम-२०२६ नुसार भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा **मौजे चिरली ता. देगलुर येथील शेत स,नं,/गट क्र.१९३ मधील ०० हे.९६ आर.** ही जमीन महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ सुधारीत नियम-२०२६ चे कलम ३(१) नुसार **भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.**

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाहीत.

स्वाक्षरीत/-
उपजिल्हाधिकारी (महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

Change In Name

My old Name is **ZARINA BEE MOHAMMAD MAHEBOOB** Which now I am Changing as New Name **ZAREENA BEGUM MOHAMMED MEHBOOB** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: 9-7-1006 Near Jani Kirana Millat Nagar Degloor Naka Nanded

SPOUSE NAME CHANGE

My old Name is **MOHAMMAD MAHEBOOB** Which now I am Changing as New Name **MOHAMMED MEHBOOB** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: 9-7-1006 Near Jani Kirana Millat Nagar Degloor Naka Nanded

---

Change In Name

My old Name is **MOHAMMAD MAHEBOOB** Which now I am Changing as New Name **MOHAMMED MEHBOOB** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: 9-7-1006 Near Jani Kirana Millat Nagar Degloor Naka Nanded

SPOUSE NAME CHANGE

My old Name is **ZARINA BEE MOHAMMAD MAHEBOOB** Which now I am Changing as New Name **ZAREENA BEGUM MOHAMMED MEHBOOB** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: 9-7-1006 Near Jani Kirana Millat Nagar Degloor Naka Nanded

---

जाहिरप्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बिलोली यांचे न्यायालय
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २६१/२०२६
सुलोचना शिवाजी भोसले व इतर वि. निरंक

अर्जदार: १. सुलोचना शिवाजी भोसले वय - ४७ वर्षे,
२. अभिजित शिवाजी भोसले वय - २४ वर्षे,
दोघे रा. दौलतापुर ता. बिलोली जिल्हा नांदेड
३. शालिनी अविनाश पाटील वय - २७ वर्षे,
मु. भोकसखेडा पोस्ट कावळगाव ता. देगलुर जिल्हा नांदेड

विरूध्द
निरंक
विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, **मयत शिवाजी शंकरराव भोसले** यांची अर्जदार क्र.१ ही पत्नी आहे. व अर्जदार क्रमांक २ हा मुलगा व अर्जदार क्र. ३ ही विवाहीत मुलगी आहे. अर्जदार क्र. १ व २ रा. दौलतापुर ता. बिलोली जिल्हा नांदेड.अर्जदार क्र.३ मु. भोकसखेडा पोस्ट कावळगाव ता. देगलुर जिल्हा नांदेड येथे वास्तव्यास आहेत. मयत **शिवाजी शंकरराव भोसले** यांचा मृत्यु **दिनांक ११/१०/२०२६** रोजी त्यांचे राहते घर दौलतापुर ता. बिलोली जिल्हा नांदेड येथे झाला. मयत **शिवाजी शंकरराव भोसले** यांचे अर्जदारा व्यतीरिक्त इतर कोणीही वारस नाहीत. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत **शिवाजी शंकरराव भोसले** यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत **दिनांक ०२/०१/२०२७** रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/ उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. ०४ नोव्हेंबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, बिलोली

जाहिर प्रगटन

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, भोकर यांचे न्यायालयात
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र. २५८/२०२६
रामप्रसाद माधवराव शेंडगे वि. ग्रामपंचायत अधिकारी/ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धानोरा
जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ चे १३(१)(३) अंतर्गत अर्ज

अर्जदार :- रामप्रसाद माधवराव शेंडगे ,
वय- ५६ वर्षे, धंदा- नौकरी ,
रा. धानोरा ता. भोकर जि. नांदेड
--------- विरुध्द---------
गैरअर्जदार :- ग्रामपंचायत अधिकारी/ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, धानोरा
ता. भोकर जि. नांदेड

प्रकरण :- जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ चे १३(१)(३) अंतर्गत अर्ज

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी विधिज्ञां मार्फत जन्म व मृत्यु नोंदणी कायदानुसार अर्ज दाखल केला असून त्यांचे म्हणणे असे आहे की, अर्जदार यांची/यांचा नात **श्रावणी माधव शेंडगे** , रा. धानोरा ता. भोकर जि. नांदेड यांचा जन्म दिनांक **३०/०८/२०१०** रोजी मौजे धानोरा , ता. भोकर जि. नांदेड येथे जन्म झाला. गैरअर्जदार कार्यालयाने दप्तरी नोंद घेण्या बाबतचा आदेश व्हावा यासाठीचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटणाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या बाबत कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा अन्यथा अर्जदाराचे म्हणणे एकुण घेवून पुढील आदेश करण्यात येईल.

आज दिनांक **०५/११/२०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यांत आले.

आदेशावरुन,

सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय, भोकर

जाहिर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधिताना प्रस्तुत जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते कि, जेतवननगर मागासवर्गीय गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. तरोडा (बु) नांदेड या संस्थेवर माझी प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. सदर संस्थेतील प्लॉट नंबर १७ सर्वे नंबर ७० गट नंबर २४०, ज्याची लांबी पूर्व -पश्चिम ४० फुट, रुंदी दक्षिण-उत्तर ३० फुट एकूण क्षेत्रफळ १२०० चौ. फुट चे मूळ मालक श्री. महाजन पि. शंकरराव पवार हे दि.०१ / ०५ / २०२५ रोजी मयत झाल्यामुळे त्यांच्या पश्च्यात त्यांच्या कुटुंबातील त्यांच्या कायदेशीर वारसांनी संमतीने प्लॉट क्र. १७ वरील एकूण क्षेत्रफळ १२०० चौ. फुट जागेबाबत वाटणी केली.सदर वाटणी पत्रानुसार प्लॉट नंबर १७ च्या पश्चिम-उत्तरेकडील मोकळी जागा व त्यास लगतच्या दोन रूम व संडास-बाथरूमसह ज्याचे एकूण क्षेत्रफळ ७२० चौ. फुट असून त्याच्या चतुःसीमा पुढीलप्रमाणे आहेत - पूर्वेस – सार्वजनिक रस्ता, पश्चिमेस -गडपाळे यांचे घर,दक्षिणेस- विलास पवार यांच्या हिश्याची जागा,उत्तरेस - कदम यांचे घर अशी आहेत.सदर एकूण क्षेत्रफळ ७२० चौ. फुट जागेची नोंद श्रीमती करुणाबाई भ. महाजणराव पवारयांच्या नावे करण्यात यावी. तसेच दक्षिण-पूर्वेकडील मोकळी जागा व त्यास लगत दोन रूमचे (चार भिंती व पिल्लर सहित) एकूण क्षेत्रफळ ४८० चौ. फुट ज्याच्या चतुःसीमा पुढील प्रमाणे आहेत-पूर्वेस - सामाईक रस्ता, पश्चिमेस - गडपाले यांचे घर, दक्षिणेस- गच्चे यांचे घर, उत्तरेस - करुणाबाई पवार यांचा हिश्याची जागा अशी आहेत. सदर एकूण क्षेत्रफळ ४८० चौ. फुट जागेची नोंद त्यांचा मुलगा विलास महाजणराव पवार यांच्या नावे करण्यात यावी याकरिता श्रीमती करुणाबाई भ. महाजणराव पवारयांनी जेतवननगर मागासवर्गीय गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. तरोडा (बु) नांदेड चे प्रशासक म्हणून जाहीर प्रगटन देणार यांच्याकडे अर्ज सादर केला आला आहे.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितास सूचित करण्यात येते कि,जेतवननगर मागासवर्गीय गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. तरोडा (बु) नांदेड मार्फतप्रशासक यांच्या हस्ते प्लॉट नंबर १७ सर्वे नंबर ७० गट नंबर २४०, ज्याची लांबी पूर्व -पश्चिम ४० फुट, रुंदी दक्षिण-उत्तर ३० फुट एकूण क्षेत्रफळ १२०० चौ. फुट जागे पैकी एकूण क्षेत्रफळ ७२० चौ. फुट जागेची नोंद श्रीमती करुणाबाई भ. महाजणराव पवारयांच्या नावे व एकूण क्षेत्रफळ ४८० चौ. फुट जागेची नोंद त्यांचा मुलगा विलास महाजणराव पवार यांच्या नावेहस्तांतरित करण्याचे निचित करण्यात आले आहे. त्याबाबत कोणास आक्षेप अथवा उजर असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह जाहीर प्रगटन देणार यांचेकडे खालील पत्त्यावर सादर करावा, मुदतीनंतर आलेला आक्षेप अथवा उजर ग्राह्य धरल्या जाणार नाही व सदर प्लॉट चे समान हिश्यात कौटुंबिक हस्तांतरण करून देण्यात येईल.

करिता सबब हे जाहीर प्रगटन.

दि. 08/11/2026.

जाहीर प्रगटन देणार
(एम. आर. येवते)
प्रशासक
जेतवननगर मागासवर्गीय गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. तरोडा (बु) नांदेड

जाहीर नोटीस

क्रं.२०२६/अपील/पिछोंडी/हिमायतनगर/सीआर-१९
उपविभागीय अधिकारी कार्यालय, हदगाव
दिनांक. ०४/११/२०२६

प्रति,
१. प्रवीण पि. सुरेश बंजेवाड वय ३० वर्ष व्यवसाय शेती
२. कौशल्याबाई भ्र. सुरेश बंजेवाड वय ५० वर्ष व्यवसाय घरकाम
३. ओंकार पि. सुरेश बंजेवाड वय ३० वर्ष व्यवसाय शेती
अ.क्र.०१ ते ०३ रा. प्रताप गल्ली, हिमायतनगर, ता हिमायतनगर जि. नांदेड ४३१८०२
४. पूजा भ्र. तेजस मालदोडे वय २५ वर्ष व्यवसाय शेती रा. थेरबन गाव, भोकर ता. भोकर जि. नांदेड ४३१८०१
५. सय्यद वसीम पि. सय्यद युसुफ वय ३५ वर्ष व्यवसाय व्यापार रा. गवली पुरा, रेल्वे स्टेशन जवळ नांदेड तालुका जिल्हा नांदेड ४३१६०१
६. अश्रफ अहमद पि. अल्ताफ अहमद वय ४० वर्ष व्यवसाय नौकरी रा.बालाजी किराणा समोर गणपती मंदिर रोड ता. जि. नांदेड
७. प्रिया भ्र. बालाजी पाटील वय वर्ष व्यवसाय घरकाम रा. प्रताप गल्ली, परमेश्वर गल्ली ता. हिमायतनगर जि. नांदेड

विषय: महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपील आणि विलंब माफ करणे बाबत

ज्या अर्थी उपरोक्त वादातील वादी १. नसीमा बेगम भ्र. सय्यद इस्माईल वय ५० वर्ष व्यवसाय घरकाम/शेती २. सय्यद फिरोज पिता. सय्यद इस्माईल वय ३० वर्ष व्यवसाय शेती दोघे रा. गाणी कॉलनी, नांदेड ता. जि. नांदेड यांनी **मौ. पिछोडी ता. हिमायतनगर येथील जमीन शेत ग. क्र.११ क्षेत्र २ हे १४ आर बाबतचे फेरफार क्र.७९३ दिनांक. २९.०७.२०२५ फेरफार क्र.८४९ दिनांक. १९.०९.२०२५ रद्द करणे व विलंब क्षमापित करणे बाबत** या कार्यालयात अपील दाखल केले आहे.

सदर प्रकरणी आपणास आपली बाजू मांडण्याकरिता या न्यायालय तर्फे बऱ्याच वेळा अर्जात नमूद पत्त्यावर आपणास नोटीस पोस्टद्वारे पाठविण्यात आले होते परंतु नोटीस तामील झाली नाही.

सबब उपरोक्त नमूद प्रकरणातील आपल्या नावे हे जाहीर नोटीस पाठवण्यात येते असून आपणास याद्वारे सूचित करण्यात येते की आपण स्वतः अथवा वकिलामार्फत दिनांक. १७/११/२०२६ रोजी दु. २.०० वाजता तहसील कार्यालय हिमायतनगर येथील सुनावणी मध्ये आपण अथवा आपले विधीज्ञ यांचे मार्फत आपले कडील संबंधित कागदपत्र आपले लेखी अथवा तोंडी म्हणणे सादर करावे अन्यथा आपणास याबाबत काही सांगायचे नाही असे गृहीत धरून प्रकरण गुणवत्ते नुसार निकाली काढले जाईल याची नोंद घ्यावी.

उपविभागीय अधिकारी हदगाव

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308

दुष्काळी परिस्थितीत शेतकरी-पशुपालकांच्या पाठीशी प्रशासन खंबीरपणे उभे -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

पाथरड येथे दूध उत्पादक भावफरक वितरण व दुष्काळ निवारण मार्गदर्शन मेळावा

नांदेड (प्रतिनिधी)– दुष्काळी परिस्थितीत शेतकरी आणि पशुपालकांना दिलासा देण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत विविध उपाययोजना राबविण्यात येत असून, पशुधनासाठी चारा व पाण्याचे योग्य नियोजन करण्यावर भर देण्यात येत आहे. शेतकरी व पशुपालकांनी उपलब्ध साधनसंपत्तीचा काटकसरीने वापर करून शासकीय योजनांचा लाभ घ्यावा. जिल्हा प्रशासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.



हदगाव तालुक्यातील पाथरड येथे पाथरड दूध उत्पादक असोसिएशनच्या वतीने आयोजित दूध उत्पादक भावफरक वितरण व दुष्काळ निवारण मार्गदर्शन मेळाव्यात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाबुराव पाटील पाथरडकर होते. यावेळी उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन डॉ. सखाराम खुणे, सहायक आयुक्त डॉ. प्रवीणकुमार घुले आदी उपस्थित होते.

डॉ. खुणे यांनी पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजना व विदर्भ-मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पांतर्गत उपलब्ध सुविधांची माहिती दिली. सोयाबीन कुटाराचे पोषणमूल्य वाढविणे, कडबाकुट्टी, मुरघास निर्मिती, हिरव्या चाऱ्याचे उत्पादन आणि संतुलित पशुआहार याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. घुले यांनी चारा साक्षरता अभियान व दुष्काळ निवारणासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती दिली. यावेळी जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ अंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते पशुपालकांना संकरित ज्वारीच्या 'शुगरग्रेज' चारा बियाण्याचे प्रातिनिधिक वाटप करण्यात आले. तसेच उच्च उत्पादनक्षम पशुधन निर्मितीसाठी लिंगवर्गीकृत रेतमात्रा सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले.

पाथरड दूध उत्पादक असोसिएशनच्या कार्याचे कौतुक करत जिल्हाधिकाऱ्यांनी दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून गावातील शेतकऱ्यांनी उभारलेल्या आर्थिक प्रगतीच्या आदर्शाचे विशेष उल्लेख केला. कार्यक्रमानंतर त्यांनी प्रगतिशील पशुपालक गोविंद पवार यांच्या मुक्त संचार गोठ्याला भेट देऊन संकरित गाईंचे संगोपन, हिरवा व वाळलेला चारा, सोयाबीन कुटार आणि मुरघास साठवणुकीची पाहणी केली.

यावेळी तहसीलदार, गटविकास अधिकारी, अमूल डेअरीचे अधिकारी, पशुसंवर्धन, महसूल, पंचायत समिती, रोजगार हमी व सहकार विभागाचे अधिकारी-कर्मचारी तसेच परिसरातील दूध उत्पादक व पशुपालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


सोलार प्लांटच्या नावाखाली भोकर वनपरिक्षेत्रात हजारो वृक्षांची कत्तल

भोकर (प्रतिनिधी)– सोलार प्लांट उभारणीच्या नावाखाली भोकर वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या विविध गावांच्या परिसरात हजारो वृक्षांची अवैधरित्या कत्तल होत असल्याची गंभीर बाब निसर्गप्रेमींकडून समोर आली आहे. अवादा, इनरिच द सोलार पीपल (पुणे) यांसारख्या सोलार कंपन्यांच्या प्रकल्पांच्या परिसरात सागवान, लिंब, पळस, तेंदू, चार, हेंळ आदी विविध जातींच्या वृक्षांची मोठ्या प्रमाणावर तोड झाल्याचे निदर्शनास येत आहे.

चिंचाळा, सोनारी, रेणापूर, कोळगाव, नांदा बु., मौखेडी, शिरूर, पांडुर्णा, रिठ्ठा, नारवट, हळदा आदी गावांच्या परिसरासह गावांकडे जाणाऱ्या रस्त्यालगत ही वृक्षतोड झाल्याचे सांगण्यात येत आहे. विशेष म्हणजे रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांनाही सहज दिसणारी ही वृक्षतोड वनविभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या नजरेस पडली नाही का? असा सवाल उपस्थित होत आहे.

भोकरचे वनपरिक्षेत्र अधिकारी अंगद खटाणे यांच्या कार्यकाळात एवढ्या मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असताना वनविभागाकडून प्रभावी कारवाई का करण्यात आली नाही, याबाबतही संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणात संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष आहे की अन्य काही हितसंबंध आहेत, याची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे.

एकीकडे शासन कोट्यवधी रुपये खर्च करून वृक्षलागवडीचे अभियान राबवत आहे, तर दुसरीकडे



हजारो वृक्षांची कत्तल होत असल्याचे चित्र पर्यावरण संवर्धनाच्या धोरणालाच हरताळ फासणारे आहे. त्यामुळे संबंधित सोलार प्रकल्पांच्या कामांची व वृक्षतोडीच्या परवानग्यांची गांभीर्याने तपासणी करून अनधिकृत वृक्षतोड तत्काळ थांबवावी, दोषींवर कठोर गुन्हे दाखल करावेत, तसेच दोषी आढळणाऱ्या वनविभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी निसर्गप्रेमींकडून होत आहे.

मराठा सेवा संघाने दिली आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना मदत

नांदेड (प्रतिनिधी)– मराठा सेवा संघाच्यावतीने माळकौठा येथील मयत चंद्रकांत दगडोजी शिंदे यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी दिवाळीच्या पूर्वसंध्येला १ लाख ११ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली.

मराठा सेवा संघाने नांदेड जिल्ह्यात अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत.अनेक होतकरू, गरजू लोकांची सेवा केली आहे. सामाजिक बांधिलकी आणि मानवतेचा आदर्श जपत मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड, वीर भगतसिंग विद्यार्थी परिषद व इत्तर कक्षाच्या वतीने खाजगी फायनान्सच्या जाचास कंटाळून माळकौठा येथील मयत चंद्रकांत दगडोजी शिंदे या शेतकऱ्याने आत्महत्या केली व आत्महत्या घडवून आणली ही बाब निष्पन्न नाही. शिंदे कुटुंबाची सांत्वपनपर भेट घेऊन १ लाख ११ हजार रुपयांचा धनादेश देऊन आर्थिक मदत देण्यात आली.



कुटुंबावर कोसळलेल्या दुःखाच्या प्रसंगी त्यांना आधार मिळावा, संकटातून सावरण्यास मदत व्हावी आणि समाजातील एकजुटीची भावना अधिक दृढ व्हावी या हेतूने ही आर्थिक मदत देण्यात आली. या उपक्रमातून सामाजिक संवेदनशीलता, माणुसकी आणि परस्पर सहकार्याचा संदेश देण्यात आला.

या प्रसंगी मधुकरराव देशमुख, इंजि. व्ही. टी. शिंदे, इंजि. शे. रा. पाटील, संतोष गव्हाणे, संकेत पाटील, पंडित कदम, सतीश जाधव, एच. डी. पाटील, व्ही. डी. पाटील, सुभाष कोल्हे, कमलेश पाटील, इंजि. प्रवीण जाधव पिंपळदरीकर, सुमित्राताई वडजकर, सौ. सत्यभामाताई जाधव, शिवाजी पाटील आलेगावकर व विनायकराव कदम, नानाराव कल्याणकर आदींची उपस्थिती होती.

संकटात सापडलेल्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी होऊन त्यांना मदतीचा हात देत, सामाजिक बांधिलकी जपली व भविष्यातही सर्वजण सोबत राहणार असल्याचे मराठा सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

लोकशाही बळकटीकरणासाठी युवकांचा सक्रिय सहभाग आवश्यक

'विकसित भारत युवा संवाद'मध्ये खा. डॉ. अजित गोपछडे यांचा विद्यार्थ्यांशी थेट संवाद

नांदेड (प्रतिनिधी) – युवकांमध्ये लोकशाही प्रक्रियेविषयी जागरूकता निर्माण करून राष्ट्राच्या विकासाशी संबंधित विषयांवर त्यांचे विचार जाणून घेण्याच्या उद्देशाने माय भारत यांच्या वतीने 'विकसित भारत युवा संवाद Know Your Vote' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या विविध प्रश्नांना उत्तरे दिली. युवकांनी सामाजिक जबाबदारी स्वीकारून लोकशाही प्रक्रिया आणि देशाच्या विकासात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाला संस्थेचे संचालक डॉ. महेश कोकरे, नगरसेवक शांभवी साले, माय भारतच्या जिल्हा युवा अधिकारी अशनी कानकटे, प्रा. माधव वैद्य, प्रा. देवयानी देशमुख आणि प्रा. रेखा भालेकर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा युवा अधिकारी अशनी कानकटे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. देवयानी देशमुख यांनी निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेचे दृकश्राव्य सादरीकरण करून मतदार नोंदणी व मतदार यादी पडताळणीची माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वच्छता, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील युवकांचा सहभाग, मतदार यादी पुनरीक्षण, वैद्यकीय प्रवेश परीक्षा, ऑनलाईन जुगारविरोधी कायदा, अल्पवयीन मुलांवरील समाजमाध्यमांचा प्रभाव आणि 'एक देश, एक परीक्षा' यांसारख्या विषयांवर प्रश्न उपस्थित केले. खा. डॉ. गोपछडे यांनी या प्रश्नांना उत्तरे देत शासनाच्या विविध योजना, कायदे व विकासात्मक उपक्रमांची माहिती दिली.

कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचे महत्त्व विशद करताना त्यांनी कृषी विज्ञान केंद्र, अंबाजोगाई येथे आयोजित ड्रोन कार्यशाळेचे उदाहरण दिले. युवकांनी नव्या तंत्रज्ञानाची माहिती घेऊन सामाजिक व राष्ट्रीय विकासात योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले. या संवादातून विद्यार्थ्यांना लोकप्रतिनिधींशी थेट चर्चा करून विविध राष्ट्रीय व सामाजिक विषयांवरील शंका व्यक्त करण्याची संधी मिळाली. लोकशाहीतील युवकांचा सहभाग आणि राष्ट्रनिर्मितीतील त्यांची भूमिका अधोरेखित करणाऱ्या या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

आसना गार्डनमध्ये पोलीस बंदोबस्ताची मागणी

नांदेड (प्रतिनिधी)– नांदेड शहरातील चैतन्यनगर ते विमानतळ रस्त्यालगत असलेल्या आसना गार्डनमध्ये पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात यावा, या मागणीसाठी शुक्रवारी आसना मॉर्निंग वॉक ग्रुपच्या वतीने पोलीस अधीक्षक निलाभ रोहन यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. ग्रुपचे अध्यक्ष आनंद कल्याणकर यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळात शैलेश क्षीरसागर आणि राहुल धूतमल यांचा समावेश होता.

आसना गार्डन सकाळी ५ ते ९ आणि सायंकाळी ५ ते रात्री ९ या वेळेत नागरिकांसाठी खुले असते. मात्र, गार्डन बंद असलेल्या वेळेत काही टवाळखोर मुले-मुली कुलूप तोडून आत प्रवेश करतात. गेटला लावलेल्या साखळ्याही चोरीला जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या गार्डनमध्ये दररोज सकाळी आणि सायंकाळी मिळून सुमारे पाच हजार नागरिक फिरण्यासाठी येतात. यामध्ये महिला, लहान मुले, मुली आणि ज्येष्ठ नागरिकांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. मात्र, काही टवाळखोरांकडून त्यांना त्रास दिला जात असून, जाब विचारणाऱ्यांना चाकूचा धाक दाखवला जात असल्याची गंभीर बाबही शिष्टमंडळाने पोलीस अधीक्षकांच्या निदर्शनास आणून दिली.

खासगी शिकवणीच्या निमित्ताने इतर शहरांतून आलेले काही विद्यार्थी शिकवणीला न जाता गार्डनमध्ये येऊन बसतात. त्यांच्याकडून वेफर्सची पाकिटे आणि पाण्याच्या बाटल्या परिसरात टाकल्या जातात. तसेच मद्यपान करणारे आणि अमली पदार्थांचे सेवन करणारे काही लोकही गार्डनमध्ये आढळून येत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

महिला प्रवाशांना दिलासा! एसटी सवलतीसाठी एनसीएमसी कार्डची अट ३१ डिसेंबरपर्यंत शिथिल

नांदेड (प्रल्हाद कांबळे)– ज्येष्ठ नागरिक तसेच महिला प्रवाशांना रा.प. महामंडळात सवलतीचे तिकीट प्राप्त करण्यासाठी दि. १ ऑक्टोबर २०२६ पासून एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात आले होते. मात्र, आता ही अट शिथिल करण्यात आली आहे.



महिला लाभार्थ्यांची मोठी संख्या पाहता आतापर्यंत फक्त १.१० कोटी एनसीएमसी कार्ड नोंदणी/वितरित झाली आहेत. यामध्ये गाव-खेड्यातील महिलांनी माहितीअभावी अद्यापपर्यंत मोठ्या प्रमाणात नोंदणी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे महिला लाभार्थ्यांना रा.प. प्रवासभाडे सवलतीकरिता अनिवार्य करण्यात आलेली एनसीएमसी कार्डची अट दि. ७ नोव्हेंबर २०२६ पासून दि. ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत शिथिल करण्यात येत आहे. या कालावधीत सर्व महिला लाभार्थ्यांनी सदर एनसीएमसी कार्ड नोंदणीकरण करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सदर महिलांना कार्ड नोंदणी व वितरित करण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायत स्तरापर्यंत जाऊन विशेष शिबिरे राबवून कार्ड नोंदणीकरण व वितरण करण्यात यावे. यामध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रवासी संघटना, ग्रामपंचायत पदाधिकारी यांचा सक्रिय सहभाग घेऊन शिबिरे आयोजित करून दि. ३१ डिसेंबर २०२६ अखेरपर्यंत १०० टक्के एनसीएमसी कार्ड नोंदणीकरण व वितरणाची कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश राज्य परिवहन महामंडळाचे महाव्यवस्थापक (वाहतूक) यांनी दिले आहेत.

दिवाळी-छट पूजेसाठी नांदेड- पटना दरम्यान धावणार ३ विशेष रेल्वेगाड्या

नांदेड (प्रतिनिधी)– दिवाळी आणि छट पूजा या सणांच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेतर्फे नांदेड-पटना-नांदेड दरम्यान विशेष रेल्वेगाडीच्या तीन फेऱ्या चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

गाडी क्र. ०७६०९ नांदेड-पटना ही विशेष रेल्वेगाडी नांदेड येथून दर मंगळवारी दि. १०, १७ आणि २४ नोव्हेंबर रोजी रात्री ९.१५ वाजता सुटेल. पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापूर, खंडवा, इटारसी, जबलपूर, कटनी, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा आणि दानापूर या स्थानकांवर थांबे घेत गुरुवारी सकाळी ८.३० वाजता पटना येथे पोहोचेल.

गाडी क्र. ०७६१० पटना-नांदेड - ही विशेष रेल्वेगाडी पटना येथून दर गुरुवारी दि. १२, १९ आणि २६ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.१५ वाजता सुटेल. दानापूर, आरा, बक्सर, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, प्रयागराज छिवकी, माणिकपूर, सतना, कटनी, जबलपूर, इटारसी, खंडवा, मलकापूर, अकोला, वाशिम, हिंगोली, बसमत आणि पूर्णा या स्थानकांवर थांबे घेत शुक्रवारी रात्री ८ वाजता नांदेड येथे पोहोचेल.

या विशेष रेल्वेगाडीला प्रथम श्रेणी वातानुकूलित शयनयान, द्वितीय श्रेणी वातानुकूलित शयनयान, तृतीय श्रेणी वातानुकूलित शयनयान, शयनयान व जनरल असे एकूण २४ डबे असतील. प्रवाशांना या विशेष रेल्वेगाडीमुळे अतिरिक्त प्रवास सुविधा उपलब्ध होणार आहे. प्रवाशांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन दक्षिण मध्य रेल्वे, नांदेड विभागातर्फे करण्यात आले आहे.

अशोक सुन्नेवाड यांचे निधन

नांदेड (प्रतिनिधी)– नांदेड जिल्हा बुरुड समाजाचे पदाधिकारी आणि दिलीपसिंघ कॉलनीतील रहिवासी अशोक सुन्नेवाड यांचे दि. ६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ५१ वर्षांचे होते.



त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, ३ मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी रात्री शांतीधाम स्मशानभूमी गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

जुन्या भांडणातून तलवार-खंजरने हल्ला; एकजण गंभीर जखमी, चौघांना अटक

नांदेड (प्रतिनिधी)– जुन्या भांडणाच्या कारणावरून चारजणांनी संगनमत करून एका तरुणावर तलवार व खंजरने जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी चारही आरोपींना अटक केली आहे.

दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास वाय पॉईंट, गणेश नगर, नांदेड येथे ही घटना घडली. आरोपींनी जुन्या भांडणाच्या कारणावरून फिर्यादीला शिवीगाळ करून जिवे मारण्याच्या उद्देशाने तलवार व खंजरने मारहाण करून गंभीर जखमी केले. या प्रकरणी शेख मोहम्मद इद्रिस मोहम्मद इलियास, वय २४ वर्षे, रा. विसावा नगर, नांदेड यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.

सदरच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस निरीक्षक राजेश पुरी व त्यांच्या सहकाऱ्यांनी तपासाची चक्रे वेगात फिरवत आरोपी चंद्रकांत डोंगरे, वय २३ वर्षे, अतिश जाधव, वय १९ वर्षे, आदित्य भालेराव, वय २३ वर्षे, तिघे रा. लेबर कॉलनी, नांदेड आणि संतोष उर्फ गोट्या सूर्यकांत इंगळे, रा. आंबेडकर नगर, नांदेड यांना अटक केली.

त्यांच्यावर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४८१/२०२६, कलम १०९(२), २८१, ३(५) बीएनएस-२०२३ सह कलम ४/२५ भारतीय हत्यार कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर गावंडे करत आहेत.

धनेगाव येथे 'तिर्रट' जुगार अड्ड्यावर छापा; १४ जुगारी रंगेहात पकडले, ९.८३ लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने धनेगाव परिसरातील मोकळ्या जागेत सुरू असलेल्या 'तिर्रट' नावाच्या जुगार अड्ड्यावर छापा टाकून १४ इसमांना रंगेहात पकडले आहे. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल फोन आणि तीन मोटारसायकली असा एकूण ९ लाख ८३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. ५ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांच्या आदेशावरून गुन्हे शोध पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करत होते. सायंकाळच्या सुमारास गुप्त



बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, धनेगाव परिसरातील उद्धव शिंदे यांच्या मळ्याच्या बाजूला मोकळ्या जागेत काही इसम पैशांवर जुगार खेळत आहेत. या माहितीच्या आधारे पथकाने तात्काळ दोन पंचांना सोबत घेऊन सदर ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी तेथे काही इसम 'तिर्रट' नावाचा पत्त्यांचा जुगार खेळताना आढळून आले.

हे आहेत अटक केलेले आरोपी - शिवानंद रामचंद्र कदम, वय ४२, रा. तुपा, ता. जि. नांदेड, रविकांत माधवराव लहाणे, वय ३२, रा. हरसद, ता. लोहा, कृष्णा रावसाहेब शिंदे, वय २७, रा. धनेगाव, राहुल राजू निथाळे, वय २५, रा. सावंगा खु., ता. दिग्रस, जि. यवतमाळ, मारोती आनंदा गजभारे, वय २७, रा. बळीरामपूर, प्रेमानंद बाबुराव गजभारे, वय ३०, रा. बळीरामपूर, सोम मदनराव शिंदे, वय ३२, रा. धनेगाव, राम पांडुरंग मोरे, वय ३२, रा. धनेगाव, शिवम उद्धवराव कवाळे, वय ३२, रा. धनेगाव, माधव संतोष गायकवाड, वय २५, रा. धनेगाव, संभाजी संजय शिंदे, वय २८, रा. धनेगाव, केरबा रामराव शिंदे, वय ३७, रा. धनेगाव, अभिजीत भगवान ढगे, वय २५, रा. बळीरामपूर, साईराज चिलवतवार, वय २६, रा. गोपाळचावडी, नांदेड

पोलिसांनी घटनास्थळावरून जुगाराचे साहित्य, रोख रक्कम ६३ हजार ७०० रुपये, विविध कंपनीचे १३ मोबाईल, विविध कंपनीच्या ३ दुचाकी वाहने (क्र. MH-२६-F-३४८२, MH-२६-BW-७११८, MH-२६-DB-७५८९) असा एकूण ९ लाख ८३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com